आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १२ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 12 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-17 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

## महत्त्वाची बातमी

# राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांना जामीन

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. वैद्यकीय कारणास्तव नवाब मलिकांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. फेब्रुवारी 2022 मध्ये ईडीने गोवावाला कंपाऊंड प्रकरणात मनी लाँड्रिंग कायद्याखाली नवाब मलिक यांना अटक केली होती. मात्र गेल्या वर्षभरापासून मलिक कोर्टाच्या परवानगीने कुर्ल्यातील खासगी रूग्णालयात घेत आहेत. मलिकांनी बऱ्याचदा जामीनासाठी अर्ज केला होता. पण त्यांचा जामीन अर्ज वारंवार फेटाळण्यात आला होता. शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने मलिकांना मोठा दिलासा देत, वैद्यकीय कारणास्तव जामीन मंजूर केला आहे. नवाब मलिक आधी ईडी कोठडी आणि नंतर न्यायालयीन कोठडीत होते. प्रकृतीच्या कारणावरुन त्यांना जामीन मिळाला आहे. दोन महिन्यांसाठी नवाब मलिकांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. मेडिकल ग्राउंडवर नवाब मलिकांना जामीन देण्यात आल्यामुळे ईडीकडूनही विरोध करण्यात आलेला नाही. नवाब मलिक यांना किडनीचा आजार आहे. या आजारावर उपचारासाठी जामीन मिळण्याची मागणी नवाब मलिक यांनी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा हा अर्ज मंजूर करत वैद्यकीय कारणास्तव दोन महिन्यांचा जामीन मंजूर केला आहे. शिवसेनेतील फुटीनंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही उभी फूट पडली. अजित पवारांनी काका शरद पवारांची साथ सोडत भाजप आणि शिंदे गट यांच्यासोबत सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आणि राष्ट्रवादीत दोन गट पडले. एक शरद पवार गट आणि दुसरा अजित पवार गट. अशातच आता नवाब मलिकांना जामीन मिळाल्यानंतर ते कोणाची साथ देणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# गुलामीच्या खुणा कायद्यातूनही पुसणार

## गृहमंत्री अमित शाह : ब्रिटिशांनी बनवलेल्या तीन कायद्यांमध्ये दुरुस्ती

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत सीआरपीसी दुरुस्ती विधेयक सादर केले. भारतीय दंड संहिता, सीआरपीसी आणि भारतीय पुरावा कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील तिनही विधेयके शुक्रवारी लोकसभेत सादर करण्यात आली. त्यानंतही ही तिन्ही विधेयके गृहमंत्रालयाच्या स्थायी समितीकडे पाठवण्यात आली आहे. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राजद्रोहाचा कायदा रद्द करण्यात येत असल्याची मोठी घोषणाही केली.**

यासंदर्भात सरकारकडून प्रस्ताव मांडण्यात आला होता. गेल्या अनेक दशकांपासून सुरू असलेल्या या कायद्याबाबत बराच वाद झाला होता, अनेक विरोधी पक्षांनी तो रद्द करण्याची मागणी केली होती आणि त्याचा गैरवापर होत असल्याचा आरोपही केला जात होता. गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत तिन्ही विधेयके सादर केली आणि त्यानंतर ही तिन्ही विधेयके गृहमंत्रालयाच्या स्थायी समितीकडे पाठवण्यात आली आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, मी जी तीन विधेयके एकत्र आणली आहेत, ती तीन विधेयके फौजदारी कायदा प्रक्रिया, फौजदारी न्याय व्यवस्था सुधारणार आहेत. पहिला भारतीय दंड संहिता 1860 मध्ये बनवला गेला, दुसरा क्रिमिनल प्रोसिजर कोड जो 1898 मध्ये बनवला गेला आणि तिसरा इंडियन इव्हिडेन्स ॲक्ट जो 1872 मध्ये ब्रिटिश संसदेने मंजूर केला होता. हे तिन्ही कायदे रद्द करून आज तीन नवीन कायदे आणले जाणार आहेत.



गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय सुरक्षा संहिता विधेयक सीआरपीसी सादर करताना लोकसभेत सांगितले की, ब्रिटिशांनी बनवलेल्या 3 कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. (भारतीय दंड संहिता) ची जागा भारतीय न्यायिक संहिता 2023 नं घेतली आहे. तर सीआरपीसी ऐवजी भारतीय नागरी संरक्षण संहिता 2023 आणि इव्हिडेन्स ॲक्टची जागा भारतीय पुरावा कायदा 2023 ने घेतली आहे. अमित शाह म्हणाले की, नव्या सीआरपीसीमध्ये 356 कलमे असतील, यापूर्वी 511 विभाग होते. पुढे बोलताना ते म्हणाले, गुलामगिरीच्या खुणा नष्ट करून नवा कायदा आणण्याचा निर्णय घेतला आहे. लोकांचा कायद्यावरील विश्वास उडाला आहे. कारण त्यांना न्याय खूप उशिरा मिळतो. अशातच न्यायालयीन कामकाज आता डिजीटल करणार. संपूर्ण ट्रायल आता व्हिडीओ कॉलद्वारे पूर्ण केली जाईल. पुरावे गोळा करताना व्हिडीओग्राफी करणे अनिवार्य असेल. देशातील संपूर्ण कायदा आणि सुव्यवस्था बदलली जात आहे. ज्या विभागात 7 वर्षांपेक्षा जास्त शिक्षेचे प्रावधान असेल, त्या प्रकरणामध्ये पुरावे गोळा करण्यासाठी फॉरेन्सिक टीम तिथे पोहोचेल. कायद्यांमधील सुधारणांबाबत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, आता आपली ओळख लपवून किंवा बदलून एखाद्या महिलेसोबत लैंगिक संबंध ठेवणे हा गुन्हा असेल. त्यासाठी शिक्षेचेही प्रावधान असेल, असे पहिल्यांदाच केले जात आहे.

### कोणत्या गुन्ह्यासाठी किती शिक्षा असेल?

- नव्या सीआरपीसी मध्ये 356 कलम असतील, तर याआधी एकूण 511 कलम होते.
- पुरावे गोळा करताना लाईव्ह व्हिडीओग्राफी करणं अनिवार्य असणार आहे.
- ज्या कलमांतर्गत 7 वर्षांपेक्षा जास्त शिक्षेचं प्रावधान आहे, त्या विभागांमधील पुरावे गोळा करण्यासाठी फॉरेन्सिक टीम घटनास्थळी पोहोचतील.
- गुन्हा कोणत्याही भागात घडला असला तरी, पण एफआयआर देशाच्या कोणत्याही भागात दाखल होऊ शकतो.
- 3 वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकणाऱ्या कलमांसाठी सारांश चाचणी होईल.
- यामुळे या प्रकरणाची सुनावणी आणि निर्णय लवकरच येणार आहे. 90 दिवसांत आरोपपत्र दाखल करावं लागेल आणि 180 दिवसांत तपास पूर्ण करावा लागेल.
- एखाद्या व्यक्तीवर आरोप निश्चित झाल्यापासून 30 दिवसांच्या आत न्यायाधीशांना आपला निकाल द्यावा लागेल.
- भारतीय न्याय संहिता विधेयकात निवडणुकीच्या दरम्यान मतदारांना पैसे वाटप केल्यास एक वर्षांच्या शिक्षेची तरतूद प्रस्तावित आहे लग्नासाठी खोटी आमिषं, स्वत :ची खरी ओळख लपवून लैंगिक संबंध प्रस्थापित करणे हा गुन्हा ठरणार
- सामूहिक बलात्काराच्या सर्व केसेस मध्ये वीस वर्षांची शिक्षा, जन्मठेप खरी ओळख लपवणं याला लव जिहादचा कंगोरा आहे
- सरकारी अधिकाऱ्या विरोधात तक्रार झाल्यानंतर सरकार 120 दिवसात परवानगी द्यायची की नाही हे ठरवणार .120 दिवसानंतर काही रिप्लाय नाही आला तर ती परवानगी मानून पुढची कारवाई होणार.
- लहान मुलांच्या विरोधात होणाऱ्या सर्व गुन्ह्यातील शिक्षा वाढवली आहे. पूर्ण माफी मिळणार नाही अशी तरतूद शिक्षेत थोडीफार सवलत मिळू शकेल
- राजद्रोहाचे जुने कलम वगळणार पण विघटनवादी शक्तींना रोखण्यासाठी नव्या कलमांचाही समावेश

# राज्यात विजेची मागणी पुन्हा वाढली

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्यातील काही भागात पावसाने उसंत घेतल्याने तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे पंखे, वातानुकूलित यंत्रासह कृषीपंपाचा वापर वाढल्याने राज्यातील विजेची मागणी वाढून गुरुवारी (१० ऑगस्ट) दुपारी ४ वाजता २४ हजार ६२८ मेगावॅट नोंदवली गेली.

राज्याच्या बऱ्याच भागात मध्यंतरी चांगला पाऊस पडला. त्यामुळे विजेची मागणी २१ हजार ते २३ हजार मेगावॅट दरम्यान होती. परंतु, आता गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या बऱ्याच भागात पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यामुळे गुरुवारी दुपारी ४ वाजता राज्यात विजेची मागणी २४ हजार ६२८ मेगावॅटवर गेली असून त्यापैकी १६ हजार २८१ मेगावॅट विजेची निर्मिती राज्यात होत होती. सर्वाधिक ६ हजार ६९२ मेगावॅट वीजनिर्मिती महानिर्मितीकडून केली जात होती. त्यात औष्णिक विद्युत प्रकल्पातून ६ हजार १६६ मेगावॅट, जलविद्युत प्रकल्पातून ४८९ मेगावॅट, सौरऊर्जा प्रकल्पातून ३७



आणि इतर प्रकल्पातून वीजनिर्मिती होत होती, तर अदानीकडून २ हजार ९११ मेगावॅट, जिंदलकडून ३१५ मेगावॅट, आयडियलकडून २६१ मेगावॅट, रतन इंडियाकडून १ हजार ७० मेगावॅट वीजनिर्मिती होत होती. केंद्र सरकारच्या वाट्यातून राज्याला ८ हजार ३१६ मेगावॅट वीज मिळत होती. यावेळी मुंबईतही ३ हजार २१९ मेगावॅट विजेची मागणी नोंदवली गेली. विजेची मागणी वाढल्याच्या वृत्ताला महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला.

# वंदे भारत रेल्वेमध्ये सिगारेट ओढणाऱ्या फुकट्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास

आधुनिक केसरी न्यूज




**गुडूर :** वंदे भारत एक्स्प्रेसमध्ये मोठा गोंधळ झाल्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. प्रवाशांनी अक्षरशः गाडीच्या काचा फोडून बाहेर पळ काढण्याचा प्रयत्न केला आणि या सगळ्या गोंधळाला एक सिगारेट कारण ठरली होती. सिगरेटचा मोह न आवरल्याने एका प्रवाशाने चक्क ट्रेनच्या टॉयलेटमध्ये जाऊन सिगरेट पेटवली पण त्यानंतर काहीच सेकंदात जे काही घडले त्याने प्रवासी व व्हिडीओ पाहणारे नेटकरी सुद्धा थक्क झाले आहेत. तिरुपतीहून सिकंदराबादला जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेस ट्रेनमध्ये हा भयानक प्रकार घडला आहे.

वंदे भारत ट्रेन आंध्र प्रदेशातील तिरुपतीहून सिकंदराबादला जात होती. ट्रेनने गुडूर स्थानक ओलांडले होते आणि ट्रेनचे शेवटचे ठिकाण सुमारे ८ तासांच्या अंतरावर होते. एका प्रवाशाला सिगारेट ओढण्याची इच्छा झाली पण ट्रेनमध्ये सर्वांसमोर सिगारेटचे झुरके घेणे काही शक्य नव्हते. अशावेळी त्याने डोके लावून टॉयलेट गाठले आणि तिथे जाऊन सिगारेट पेटवली. काही वेळात टॉयलेटमध्ये सिगारेटचा धूर पसरताच लगेच फायर अलार्म वाजू लागला. त्यानंतर स्वयंचलित अग्निशामक यंत्रणा काम सुरू झाली आणि संपूर्ण डब्यात एरोसोल फवारणीला सुरुवात झाली.

साहजिकच, फायर अलार्म वाजल्याने प्रवासी गांगरून गेले आणि त्याच गोंधळात जीव वाचवण्यासाठी लोक सैरावैरा पळू लागले. ट्रेनला आग लागल्याच्या भीतीने काहींनी ट्रेनच्या काचा फोडून बाहेर पडण्याचा सुद्धा प्रयत्न केला. दुसरीकडे ज्या महाभागामुळे हा सगळा गोंधळ झाला तो चक्क ट्रेनच्या टॉयलेटमध्येच लपून राहिला होता. त्यानंतर जेव्हा सगळा प्रकार समोर आला आणि पोलिसांनी सदर व्यक्तीला ताब्यात घेतले तेव्हा तो चक्क विनातिकीट प्रवास करतोय हे ही लक्षात आले.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

इकडे निर्मलाताई आणि श्यामलाताई यांची स्वयंपाकघरात आवराआवर सुरु होती. बाहेरच्या ओट्यावर पिंकी आणि राजेश यांच्या गप्पाही रंगल्या होत्या. तेवढ्यात सोपानराव आणि श्यामराव तिथे आले. सोपानराव म्हणाले, ' पोरांनो, चला आता आराम करा. या शेजारच्या खोलीत तुमची झोपण्याची व्यवस्था केली आहे. अजून काही लागले तर सांगा. ' ' हो काका, असं म्हणत मुलं झोपायला गेली. थोड्या वेळाने श्यामराव, श्यामलाताई पण गेल्या. दिवसभराच्या श्रमामुळे, फिरण्यामुळे त्यांना छान झोप लागली. सकाळी पक्ष्यांच्या किलबिलाटाने त्यांना आपोआप जाग आली. गोठ्यातून गाईंचं हंबरण ऐकू येत होतं. सोपानरावांनी गाईचं दूध काढून आणलं होतंच. निर्मलाताईंनी सगळ्यांना गरमागरम दूध दिलं. सगळ्यांच्या अंघोळी झाल्या. आता श्यामराव आणि मुलांची घरी परतण्याची तयारी झाली होती. तेवढ्यात निर्मलाताईंनी सगळ्यांसाठी नाश्त्याचे आणले. काचेच्या बाऊलमध्ये कुठला तरी पदार्थ त्यांनी सगळ्यांना दिला. मुलांनी एक दोन चमचे खाताच त्यांना ती चव अतिशय आवडली. पिंकी म्हणाली, ' काकू हे काय बनवले आहे ? ' निर्मलाताई, ' हे होय ? काही नाही साधाच पदार्थ आहे. याला सातूचे पीठ म्हणतात. बऱ्याच वेळेला आम्ही नाश्त्याला किंवा संध्याकाळी भूक लागली हे करतो. यात तिखट मीठ घालूनही हे खाता येते. ' ' अरे वा, किती छान ! आई, तुला माहिती आहे का ग हे ? ' पिंकी म्हणाली. श्यामराव म्हणाले, ' अरे पोरांनो, आमच्या लहानपणी आई आम्हाला हेच द्यायची. आता तुमची आई सांगेलच तुम्हाला त्याबद्दल. ' ' बाळांनो, हा पदार्थ आता जो तुम्ही खाल्ला, त्याला सातू किंवा सत्तू म्हणतात. गहू, हरभरा डाळ किंवा दाळवा त्यापासून हे बनवतात. त्यात जिरे, सुंठ इ. घालतात. या सातूच्या पिठात गूळ किंवा साखर घालून ते खाता येते. ते थोडेसे पातळ बनवतात म्हणजे खायला छान वाटते. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशात तर अजूनही तेथील लोक हे खाऊन बाहेर पडतात. पूर्वी प्रवास करताना आपले पूर्वज याच सातूच्या पिठाचा नाश्ता करून बाहेर पडत असत. ' श्यामलाताई म्हणाल्या. ' आई, पण या सातूच्या पिठाचे नक्कीच काही फायदे असतील ना ? ' राजेशने विचारले. ' हो तर. राजेश. अरे हे पीठ फार पौष्टिक बरं का ! त्यात भरपूर प्रोटिन्स असतात. हे पीठ पचायला आणि पोटासाठीही छान असते. रक्तातील साखर सुद्धा त्यामुळे नियंत्रणात राहते, वजन कमी व्हायला मदत होते. पोटाला थंडावा मिळतो. मुख्य म्हणजे हे उत्साह आणि शक्ती देणारे आहे. **( क्रमशः )**



समृद्ध प्राचीन वारसा



# आनंदी पहाट

## आपली इच्छाशक्ती कार्यसिद्धी करू शकते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्यापैकी प्रत्येकांत काही उणिवा असतातच, उणिवा नसणारी व्यक्ती सापडणे सद्यःस्थितीत विरळाच; त्याचा शोधही न घेतलेला बरा. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यांत काहींमध्ये संकृतीचं तर काहींमध्ये काही विकृतीचं दर्शन आपल्याला घडत असतं. अर्थातच कोणत्याही विकृतीची स्वीकृती आपण सहसा करत नाही, पण आपल्या संकृतीला आणि आपापल्या प्रकृतीला साजेशी एखादी कलाकृती ठरेल अशी कृती करण्याची आपल्याला जाणीव काहीवेळा का होत नाही ? कालच्या काही उणिवा कुरवाळत बसण्यात आपण धन्यता मानतो, सतत उणिवांचीच, समस्यांचीच, दःखाचीच सर्वत्र आणि सातत्यानं का चर्चा करत राहतो ? आजच्या आपल्या आणि इतरांच्या जाणीवा जपण्याच्या दृष्टीकोनातून आपण खरंच गांभीर्यानं विचार करतो का ? आपल्या बुद्धिवादी जीवाला कालच्या उणिवा दूर करून, आजच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आज खरी गरज आहे. ह्यासाठी आपल्या प्रत्येकाचेच विचार, वर्तन आणि व्यवहार हे स्वतः पुरते मर्यादित न ठेवता इतरांच्या उणिवा दूर करून, त्यांच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याच्या कामी यायला हवेत. उद्याचा येणारा प्रत्येक क्षण विलक्षण कसा करता येईल, त्याची सुरुवातच सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहारानं कशी होईल, हे आपण अभ्यासपूर्ण वैचारिक मंथनातून ठरवू शकतो आणि त्यानुरूप कार्यकृती करू शकतो. ह्याठिकाणी आकर्षणाचा सिद्धांत ह्या शास्त्रीयदृष्ट्या प्रयोगा अंती सिद्ध आणि स्पष्ट झालेल्या शास्त्रीय प्रयोगाचा वापर उपयुक्त ठरू शकतो. थोडक्यात, आपल्या आंतरिक इच्छाशक्तीच्या जोरावर आपण आपली कार्यसिद्धी करू शकतो, त्यांत भरघोस यशही संपादन करू शकतो, अशा दृष्टीकोनातून आकर्षणाचा सिद्धांत आपल्या सुखी, आनंदी आणि मनःशांती देऊ करणाऱ्या उद्यासाठी आपण आजपासून रोजच वापरू शकतो.



आधुनिक केसरी

**संतांचे चरण | सोडू नको ||**
जागा हो साधका | काळ नाही बरा ||
यमाचा सोयरा | उभा दारी ||१||
आनंदाचे झाड | सुकाया लागले ||
अंतरी आटले | प्रेम झरे ||२||
लोचनी दाटले | वांझोटे गगन ||
पारोशे अंगण | टाहो फोडी ||३||
अहंकार पाया | स्वार्थाचे शिखर ||
तेथे कैसे स्थिर | समाधान ? ||४||
झोंबु दे मनाला | स्वानंदाचा वारा ||
मुक्तीचा सोयरा | पंढरीत ||५||
सावध हो आता | होऊ दे स्मरण ||
संतांचे चरण | सोडू नको ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

अम्भोजवदने देवि हृत्कमलं विलसेच्च मे | दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ६४ || हे कमलवदने, देवी, माझे हृदयकमल विलसित व्हावे. आनंदी व्हावे. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

मुक्ति ईश की प्राप्ति जो, कर्मन से नहिं होय ।
कर्म करे फिर तन धरे, भोग विविध विधी सोय ।।५५ ।। (स्वर्वेद पंचम मण्डल द्वादश ०५/१२/५५.

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
कर्मांच्याद्वारे ईश्वराची प्राप्ती किंवा मुक्ती होत नाही. कर्म केल्याने पुन्हा शरीर मिळते आणि विविध प्रकारचे भोग प्राप्त होतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# मोक्षलक्षण

आधुनिक केसरी

मित्रांनो आपण मागण्या समासात चार प्रकारच्या आकाशाचा अभ्यास केला. परत त्याची ऊजळणी करून पुढच्या ओळीकडे वळूयात, घटाकाश, मठाकाश, महदाकाश,चिदाकाश. हे ते चार आकाशाचे प्रकार आहेत. त्याच प्रमाणे जीवात्मा, परमात्मा आणि निर्मळात्मा हे जरी स्वतंत्र आहेत असे वाटले तरी सर्व एकचं आहेत. चौघांचा मिळून एक आत्मा आहे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

घटाला व्यापून असणारे जे आकाश आहे ते घटाकाश होय. त्याच प्रमाणे पिंडाला व्यापून असणारे परब्रह्म त्याला जीवात्मा म्हणतात. मठाला व्यापणारे आकाश ते मठाकाश होय. तर विश्वाला व्यापून असणारे जे परब्रह्म त्यास शिवात्मा म्हणतात. तर मठाबाहेर असणारे जे आकाश ते महदाकाश होय. तर विश्वाच्या बाहेर जे परब्रह्म आहे त्यास परमात्मा म्हणतात. कोणत्याही मर्यादा नसलेले उपाधि नसलेले जे आकाश आहे ते चिदाकाश होय. तर कोणत्याही उपाधी पासून वेगळे असणारे जे परब्रह्म आहे त्याला निर्मळात्मा किंवा परमेश्वर म्हणतात. घटी,मठी आकाशी ही ऊक्ती जरी योग्य असली तरी आकाश भेदयुक्त भासले तरी ते मूळ अभेद्य आहे. *जन्ममरणाच्या यातनेतून सुटण्याचा मार्ग
मी तर सतत म्हणते की "मी देह आहे" हा अहम भाव बाजूला ठेवला व दैनिक कर्म करत सत्ता, भौतिक गोष्टींचा हव्यास ह्याला दुय्यम स्थान दिले. सतत सत्कर्म करत जीवन सत्कारणी लावले तर ते परमात्म्याला अतिप्रिय आहे. म्हणून तत्ववादी होऊन सतत सन्मार्गावर चालावे.

# नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे

आधुनिक केसरी

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, 'मुलाचे प्रेम कसे येईल ?' असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा 'मुलाचे प्रेम कसे येईल' हा प्रश्न करण्याऐवजी 'मूल कसे होईल' याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर 'नामाचे प्रेम कसे येईल' असा करण्याऐवजी, 'मुखी नाम कसे येईल' असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसऱ्या कोणाचीही नसून आपली स्वतःचीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरूवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वतःचाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, 'प्रेम का येत नाही', याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, 'नाम घेत नाही म्हणून.' यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे



सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात्, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण 'प्रेम का येत नाही', असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वतःला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे.

आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात 'मिळविण्यापेक्षा' मिळविलेले 'टिकविणे', हेच जास्त कठीण आहे. ज्याला 'मी काही तरी झालो' असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे.

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

एका गावात एक वैद्य राहात होता. त्या वैद्याला कोणाला काय रोग झाला आहे हे तोंडावरून समजत असे. त्याने एक दिवस एका मनुष्याला आपल्या घरावरून जाताना पाहिले आणि त्याला आत बोलावले. वैद्याने त्या माणसाला सांगितले की, " तुला एक भारी रोग झाला आहे; पण मी सांगतो ते औषध घे आणि मी सांगेन तसे पथ्य पाळ म्हणजे तुझा रोग बरा होईल." वैद्याने सांगितलेले औषध आणि पथ्य त्या मनुष्याने पाळले नसते तर त्या वैद्याचे काही नुकसान होते का ? त्या प्रमाणेच संत लोक जे आपल्याला करायला सांगतात, त्यात त्यांना स्वतःला काही मिळवायचे असते का ? आपल्याला गुरु सांगत असतात, त्यांचे ऐकल्याने आपलाच फायदा होत असतो. ते आपल्याला भवरोग झाला आहे असे सांगतात आणि त्या करिता संतसंग करा आणि नामात रहा म्हणून सांगत असतात. ते जे सांगतात ते स्वतः अनुभव घेऊनच सांगत असतात. क्रमशः



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयते प्रजाः ।यत्स्याद्धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः ॥

स्पष्टीकरण – धर्मासाठी माणूस नसतो, तर माणसासाठी धर्म असतो. त्यामुळे केवळ पोथीवरून धर्माचा अर्थ लावता कामा नये. जो आवरल्यामुळे समाजाचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन होईल, तो धर्म समजावा. धर्माने समाज नीतिमान बनला पाहिजे, उद्योगी बनला पाहिजे आणि त्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष झाला पाहिजे. तसे होत नसेल, तर धर्मात कुठेतरी चूक झाली आहे, असे समजावे.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, १२ ऑगस्ट २०२३



सायलेंट किलर आजार!
पान ६



उमेदवारांनी 'जगाव की मरावं'
पान ७



# रेकॉर्ड... वाघाला पकडण्याचा

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** आजवर आपण अनेक रेकॉर्ड झालेले पाहीले आहेत ऐकले आहेत. अनेक रेकॉर्ड ची नोंद वेगवेगळ्या ठीकाणी झालेलेही आपण वाचले असेलच. पण, थेट वाघालाच पकडण्याचा रेकॉर्ड म्हण्टल तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. पण हो हे खरंय की एक दोन नव्हे , दहा विस नव्हे तर तब्बल 58 वाघांना पकडण्याचा रेकॉर्ड चंद्रपूरातील पशुवैद्यकीय अधिकारी रविकांत खोब्रागडे यांच्या नावावर नोंदल्या गेला आहे. तसे चंद्रपूरातील ताडोबातील वाघ सर्वदूर परीचीत आहेतच. आणि येथील वाघांच्या वाढत्या संख्येमुळेही ताडोबा आता जागतीक स्तरावर पोहोचले आहेच. परंतू मानव वन्यजिव संघर्ष हा देखील ईथला ज्वलंत विषय झाला आहे.मानव वन्य जीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवरच अनेकदा नागरिकांच्या तक्रारी असो ई राजकारण्यांचा दबाव , किंवा म आपसातील संघर्षांतून जखमी झालेले वाघ असोत अशा वाघांना पकडून त्यांना पिंजऱ्यात बंद करणे हे मोठे जिकरीचे काम असते. आणि त्यासाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच कामही तितकंच मोलाचं असतं. चंद्रपूरातील पशुवैद्यकीय अधिकारी रविकांत खोब्रागडे यांनी आजवर तब्बल 58 वाघांना पकडून पिंजऱ्यात बंद केलंय. यात काही मानव वन्य जीव संघर्षांतून पकडलेले तर काही जखमी झालेल्या वाघांचा यात समावेश आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर रविकांत खोब्रागडे यांच्यासह शुटर असलेले पोलीस नाईक अजय मराठे , वाहन चालक अमोल करपे , अक्षय दांडेकर यांच्या टिम ने वांढरी परिसरातील एक वाघीन पकडून त्यांनी 58 हा आकडा पुर्ण केल्याने डॉक्टर रविकांत खोब्रागडे हे " अबतक 58 " चे मानकरी ठरले आहेत. रंतू हा आगळावेगळा रेकॉर्ड आपल्या नावावर करतांना डॉक्टर रविकांत खोब्रागडे यांना बरेचदा काही अडचणींचा सामना तर करावा लागलाच शिवाय कधीकधी हे रेस्क्यू ऑपरेशन त्यांच्या जिवावरही बेतले आहे. एकदा 3 जून 2021 ला ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर रविकांत खोब्रागडे हे आपल्या टिम सह ताडोबा जवळील डोणी गावामधे बेशुद्ध पडलेल्या वाघाला पाहायला गेले असता वाघाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला आणि त्यांचा पाय पकडला. सुदैवाने यावेळी पायात जोडे असल्याने जखम मोठी झाली नाही कारण सोबत असलेल्या टिम ने लगेच ॲक्शन घेतल्याने मोठी दुर्घटना टळली. पण या हल्ल्यात त्यांच्या पायाची करंगळी मात्र तुटली तर दुसर्या पायाला मोठी जखमही झाली होती.

असे असले तरी डॉक्टर खोब्रागडे हे आजही आपले कर्तव्य अतीशय तत्परतेने पार पाडतात.केवळ वाघच नव्हे तर अनेक वन्य जीवांचेही त्यांनी यशस्वीरीत्या रेस्क्यू ऑपरेशन पार पाडले आहे.

सरकार दरबारी अबतक 58 ची काय दखल घेतली जाते याकडे आता चंद्रपूरकरांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्राचे वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या वनविभागाकडून अबतक 58 ला कसे गौरवांकीत केले जाते हे आता चंद्रपूरकरांना पाहायला आवडेल.

# मुख्यमंत्र्यांच्या एका खुर्चीवर दोन उपमुख्यमंत्री डोळा ठेवून

## नाना पटोले : भाजपाप्रणित शिंदे सरकार हे गम्मत जम्मत सरकार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील भाजपाप्रणित शिंदे सरकार हे गम्मत जम्मतचे सरकार आहे. या सरकारमध्ये एक मंत्री सहा जिल्ह्याचा पालकमंत्री आहे. ३६ जिल्ह्याला १९ पालकमंत्री नियुक्त केले असून १७ जिल्ह्याला अजून पालकमंत्रीच नाहीत. १५ ऑगस्टला ध्वजारोहण कोण करणार यावरून सरकार संभ्रमात आहे. पालकमंत्री नसताना जिल्हाधिकारी व आयुक्त यांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाईल असे सरकारने जाहीर केले होते पण त्यात पुन्हा सुधारणा करावी लागली. मुख्यमंत्र्यांच्या एका खुर्चीवर दोन उपमुख्यमंत्री डोळा ठेवून आहेत. सरकारमध्ये सावळा गोंधळ सुरु आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. टिळक भवन येथे पत्रकारांशी बोलताना पटोले म्हणाले की, तीन पक्षांच्या या सरकारला जनतेच्या समस्यांचे काहीही पडलेले नाही. राज्यातील प्रशासन कोलमडले आहे, तहसिलदार दर्जाच्या अधिकाऱ्यांना लाच घेताना रंगेहाथ अटक केले जात आहे, हे चांगले लक्षण नाही. प्रशासनावर सरकारचा वचक नसल्याने भ्रष्टाचार बोकाळला आहे. राज्यात दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे, आधी अतिवृष्टी झाली तर आता पाऊसच गायब झाला आहे. खरीपाची पिकं धोक्यात आली आहेत. जनता बेहाल असताना त्यांच्यासाठी काही करण्याऐवजी सरकारी तिजोरी कोण जास्त लुटतो याची तीन पक्षात स्पर्धा सुरु आहे. मख्यमंत्र्यांच्या ठाणे शहरात एकाच दिवसात ५ रूग्णांचे मृत्यू होतात हे दुर्दैवी आहे. राज्याचे आरोग्य बजेट एक टक्का आहे ते वाढवून १५ टक्के केले पाहिजे. राज्यातील आरोग्य सेवाच आजारी पडली आहे, रुग्णालयात डॉक्टर, नर्सेस, औषधे नाहीत ही अवस्था आहे. लोकांना साध्या वैद्यकीय सुविधाही मिळत नाहीत, केवळ मुठभर लोकांचे हे सरकार आहे.

आधुनिक केसरी वॉच..

# शेतकऱ्यांच्या शोषण मुक्तीचा अमृत महोत्सव कधी साजरा होणार..?

## शेतकरी आजही आर्थिक पारतंत्र्यातच..!

आधुनिक केसरी न्यूज

देशाचे पहिले कृषिमंत्री शेतकऱ्यांचे कैवारी डॉ.पंजाबराव देशमुख म्हणाले होते, ' शेतकरी उत्पादित केलेला शेतमाल उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीला विकतो. आणि रोजच्या गरजेसाठी लागणारा माल अथवा वस्तू उत्पादन खर्चापेक्षा अनेक पट अधिक किंमत देऊन खरेदी करतो. त्यामुळे शेती आणि शेतकरी कायमस्वरूपी अंदरबट्ट्यातच राहतो. यासाठी सरकारने शेतकऱ्यांच्या समस्या गांभीर्याने जाणून घेऊन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहायला पाहिजे. तरच शेतकरी सुखाने जगू शकतो..!' पण आजपर्यंतच्या कोणत्याही सरकारने डॉ.पंजाबराव देशमुख यांचे शेती व शेतकऱ्यांविषयीचे विचार समजून घेतले नाहीत परिणामी स्वातंत्र्याचे ७५ वर्षे उलटूनही, आज शेतकरी आर्थिक पारतंत्र्यातच आहेत.त्यामुळे त्यांच्या समस्या आणि शोषण मुक्तीचा अमृत महोत्सव कधी साजरा होणार.. ? हा गंभीर प्रश्न आपल्या कृषी प्रधान देशासमोर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवातही कायम आहे.



वसंत खडसे
9373578429

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झालीत. त्या अनुषंगाने गेल्या वर्षभरापासून संपूर्ण देशवासी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आनंदात साजरा करत आहेत. त्यात सदैव चिंताग्रस्त व निसर्गाच्या लहरीपणाची टांगती तलवार नेहमी डोक्यावर असताना सुद्धा, आपले सर्व दुःख निमुटपणे गिळून आपल्या देशाची आन, बान, शान असलेल्या तिरंग्याच्या सन्मानासाठी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात शेतकरी सुद्धा हिरारीने सहभागी झाले आहेत. किंबहुना आघाडीवर आहेत, कारण सरकारने ' हर घर तिरंगा ' अभियान राबविले त्यात प्रत्येक घरावर तिरंगा रोवला गेला ही सर्वांसाठी गर्वाची बाब आहे. पण शेतकऱ्याने मात्र केवळ आपल्या घरावरच नव्हे; तर शेतात जुंपलेल्या आपल्या औतावर सुद्धा तिरंगा फडकवून अमृत महोत्सव हर्षल्हासात साजरा केला, ही स्वाभिमानाची बाब आहे. कारण शेतकरी हा या मातीचा खरा ' भूमिपुत्र ' आहे हे इथे वावगे ठरू नये..! मात्र आजपर्यंत इथल्या ' सिस्टम ' ने या भूमिपुत्रांना उपेक्षितच ठेवले आहे ही आपल्या देशातील सर्वात मोठी शोकांतिका आहे.

आज शेतकऱ्यांसमोर दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, अवकाळी पाऊस, पिकांवरील रोग आदी समस्या ' आ ' पासून उभ्या आहेत. त्यामुळे उत्पादन खर्चाइतकेही उत्पन्न होईल, की नाही याची शाश्वती कोणालाही देता येत नाही. आणि जेमतेम उत्पन्न झालेल्या शेतमालाला योग्य भाव देण्याचे स्वातंत्र्यही शेतकऱ्यांना नाही. इथेही व्यापाऱ्यांकडून त्यांचे शोषण होते. अशा कित्येक समस्या आहेत, की त्या समस्यांचे मूळ शोधण्यात आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निवारण करण्यात आजवर एकाही सरकारला यश आले नाही. किंवा त्यासाठी कुठल्याही सरकारने पुढाकार घेतला नाही. असे म्हणल्यास अतिशयोक्ती ठरू नये..! त्यासाठी, जोपर्यंत सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांच्या समस्या आणि शोषण मुक्तीचा अमृत महोत्सव कधी साजरा होणार.. ? हा प्रश्न कायमच राहणार आहे.

# काँग्रेसवरच जनतेचा अविश्वास; पंतप्रधान नरेंद्र मोदींचा लोकसभेत घणाघात

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** काँग्रेस पक्ष आपल्या अहंकाराने एवढा आंधळा झाला आहे, की त्यांना सत्य दिसत नाही. देशाच्या जनतेमध्येच त्यांच्याबाबत प्रचंड अविश्वास आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरूवारी विरोधकांवर टीका केली. यावेळी त्यांनी मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित व्हावी, यासाठी केंद्र व राज्य सरकार प्रयत्न करीत असून त्याला लवकरच यश येईल, अशी ग्वाहीदेखील दिली. भाषण सुरू असतानाच विरोधकांनी सभात्याग केल्यामुळे अविश्वास प्रस्ताव आवाजी मतदानाने फेटाळण्यात आला.

काँग्रेसचे उपनेते गौरव गोगोई यांनी मांडलेल्या अविश्वास प्रस्तावावर मंगळवारी लोकसभेत चर्चा सुरू झाली होती. तीन दिवस सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या ठरावाच्या समर्थनार्थ किंवा विरोधात आपल्या भूमिका मांडल्या. त्यानंतर गुरूवारी संध्याकाळी सव्वापाचच्या सुमारास पंतप्रधान मोदी या चर्चेला उत्तर देण्यासाठी उभे राहिले. जगभरातील एखाद्या सर्वेक्षणामधून देशविरोधी अपप्रचार होत असेल, तर तो अधिक फुलविण्यामध्ये काँग्रेसला अभिमान वाटतो. त्यामुळेच तमिळनाडू, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, गुजरात, बिहार, त्रिपुरा, ओडिशा या राज्यांमधील जनतेने काँग्रेसवर आपला अविश्वास जाहीर केला आहे.

पंतप्रधानांनी आपल्या भाषणामध्ये 'इंडिया' आघाडीच्या नावावरही जोरदार तोंडसूख घेतले. जुन्याच गाडीला नवा रंग फासून ती 'इलेक्ट्रिक वाहन' असल्याचे सांगून तुम्ही रस्त्यावर आणली आहे, असा टोमणा त्यांनी लगावला. ही 'इंडिया' आघाडी नसून 'घमंडिया' आघाडी आहे, या मोदींच्या वक्तव्यावरून विरोधकांचा संताप झाला आणि त्यांनी सभात्याग केला. सदर अविश्वास प्रस्ताव हा मुख्यतः मणिपूमधील हिंसाचाराच्या मुद्दयावर आला असतानाही पहिल्या दीड तासात पंतप्रधानांनी मणिपूरमधील हिंसाचारावर भाष्य केले नव्हते. विरोधकांच्या सभात्यागानंतर त्यांच्या भाषणामध्ये मणिपूरचा मुद्दा सर्वप्रथम आला.

मणिपूरमधील हिंसाचार आटोक्यात आणून तेथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून एकत्रितरित्या प्रयत्न केले जात आहेत, अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिली. महिलांबाबत अत्यंत गंभीर अपराध करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही, त्यांना कठोरात कठोर शिक्षा होईल, असेही ते म्हणाले. 'मणिपूरमध्ये भारतमातेला इजा' केल्याच्या राहुल गांधी यांच्या विधानामुळे देशवासियांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. काही जण भारतमातेच्या मृत्यूची इच्छा का करीत आहेत, असा सवाल मोदी यांनी केला. ''हे लोक ( काँग्रेस ) लोकशाहीची हत्या, राज्यघटनेची हत्या अशी ओरड करतात. पण भारतमातेला गुलामगिरीतून मुक्त करण्याची वेळ आली, तेव्हा यांनीच तिचे तीन तुकडे केले, असा घणाघात मोदी यांनी केला. मणिपूरमधील घटना वेदनादायी आहेत. महिलांवर अत्याचार अस्विकारार्ह असून गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार काम करीत आहे, असे ते म्हणाले. याबरोबरच इशान्येकडील राज्यांमध्ये आपल्या सरकारने राबविलेल्या विकासकामांची यादीदेखील पंतप्रधानांनी यावेळी वाचून दाखविली. आपण आतापर्यंत ५०पेक्षा जास्त वेळा इशान्येकडील राज्यांना भेटी दिल्या असून आपल्या मंत्र्यांनी ४०० पेक्षा जास्त वेळा दौरे केल्याचा दावाही त्यांनी केला.

# राहुल गांधींची टीका

आधुनिक केसरी

मणिपूच्या मुद्द्यावर विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव आणला होता. त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी उत्तर दिले. आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेसने पक्ष नाव, चिन्ह सगळे कसे चोरले ते सांगितले. तसेच मणिपूरच्या मुद्द्यावरही भाष्य केले. आता या सगळ्यावर राहुल गांधींची प्रतिक्रिया आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १३३ मिनिटांच्या भाषणात फक्त दोन मिनिटे मणिपूरचा उल्लेख केला असे आता राहुल गांधींनी म्हटले आहे. काही वेळापूर्वी राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली. जर मोदींनी ठरवले तर भारताचे लष्कर अवघ्या दोन दिवसांमध्ये मणिपूरमधली परिस्थिती नियंत्रणात आणू शकतं. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी ही आग विझवू इच्छित नाहीत. त्यांना हा भडका वाढवायचा आहे, असा आरोप राहुल गांधींनी केला. तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या भाषणात फक्त दोन मिनिटं मणिपूरचा उल्लेख केला असेही राहुल गांधींनी म्हटले आहे. मणिपूरच्या कुकी क्षेत्रात जेव्हा मी गेलो तेव्हा मला हे सांगितलं गेलं की तुमच्या सुरक्षेत कुणीही मेईतेई माणूस नको, त्याला ठार केलं जाईल. तसेच जेव्हा मी मेईतेई असलेल्या भागांमध्ये गेलो तेव्हा सांगण्यात आले की कुकी माणूस नको त्याला ठार केले जाईल. मी १९ वर्षांपासून राजकारणात आहे. मात्र कुठल्याही राज्यात अशी परिस्थिती पाहिलेली नाही. मणिपूर दोन भागांमध्ये वाटले जाते आहे. यावेळी राहुल गांधी असेही म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जेव्हा बोलत होते तेव्हा ते खिल्ली उडवण्याच्या मनस्थितीत होते. संसदेत ज्या गोष्टी बोलायला नको त्या बोलल्या गेल्या. राहुल गांधी असेही म्हणाले की मणिपूरमध्ये भारतमातेची हत्या झाली हे बोललो त्याचे कारणही तेच होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी मणिपूरप्रश्नी गंभीर दिसले नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदींना माझा चेहरा टीव्हीवर पाहण्यास आवडत नाही असेही मला कधी कधी वाटते असेही राहुल गांधी म्हणाले.

# शेतकऱ्याची क्रूर थट्टा कशासाठी ?



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**आपला भारत देश हा कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो . आपली कृषी संस्कृती अत्यंत समृद्ध असून तितकाच समृद्ध वारसा आपल्या पूर्वजांचा आपल्या महामानवांचा आपल्याला लाभलेला आहे. तो म्हणजे बळीराजाचा. बळीराजाला समविभागी अर्थात कष्टातून मिळवलेल्या आनंदाची (अन्नधान्याची) समान वाटणी करणारा जगविख्यात राजा म्हणून ख्याती प्राप्त आहे. आणि म्हणूनच आपल्याकडे आजही बहीण भावाला ओवाळत असताना इडा पिडा टळो आणि बळीचं राज्य येवो अशी प्रार्थना करते ती त्याच्या असामान्य कार्यकर्तृत्वामुळे व समदर्शी दृष्टीकोणा मुळेच होय.**

त्यामुळे शेतकऱ्याला सुद्धा बळीराजाची उपमा दिली जाते परंतु तोच बळीराजा आज भुके कंगाल झालेला असून अत्यंत दयनीय अवस्थेला पोहोचलेला आहे.

केंद्र सरकारने शेतकऱ्याची प्रति दिवसाची मीळकत ही 28 रुपये घोषित केलेली आहे. कुठल्याही सरकारसाठी ही बाब लाजिरवाणी असून अत्यंत निंदनीयच म्हणावी लागेल. छत्रपती शिवाजी महाराज हे शेतकऱ्यांचे राजे होते. स्वकीयांकडून ( हिंदू ) आणि परकीयांकडून ( मुसलमान ) होणारे शेतकऱ्याचे शोषण थांबवण्यासाठी शिवबांनी स्वराज्याची निर्मिती केली. वतनदारी पद्धत रद्द करून राजांनी शेतकऱ्याची होणारी लूट थांबवली. सध्याचं सरकार हे सर्वसामान्य जनतेच्या खिशाला जीएसटी ची कात्री लावून मिळवलेला सर्व गल्ला मोजक्याच उद्योगपत्यांच्या घशात घालणारं विषमता मुलक सरकार आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि बळीराजांचा वारसा विसरून उद्योगपत्याचे करोडो रुपये माफ करणार हे सरकार म्हणजे सरकारच्या नावाला कलंक आहे असंच म्हणावं लागेल.

अलीकडेच प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा 14 वा हप्ता 27 जुलै रोजी शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आला असल्याचे मेसेज सर्वत्र व्हायरल होत आहे. काही सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते शेतकऱ्याला हिणवल्याप्रमाणे झालेना दोन हजार रुपये लेका जमा अशा पद्धतीचे वक्तव्य करताना दिसत आहे. जणू काही दोन हजार रुपये खात्यात जमा झाल्यामुळे शेतकऱ्याच्या सगळ्या आर्थिक समस्यांचं निराकरणचं झालं की काय अशा पद्धतीचा अविर्भाव या कार्यकर्त्यांमध्ये आपल्याला पाहायला मिळतो. आपल्याला माहीतच आहे की२०१४ पूर्वीच्या सरकारने सुद्धा शेतकऱ्याला रासायनिक खतावर सबसिडी देणे यासारख्या योजना राबवल्या होत्या. त्यामुळे आज डीएपी ची एक बॅग 1350 रुपयात मिळत आहे. तीच बॅग 500 रुपयाला मिळत होती. म्हणजे आज शेतकऱ्याला एका बॅग वर 850 रुपये जास्तीचे द्यावे लागतात. त्याचबरोबर विधवा, परित्यक्ता, निराधार महिलांसाठी संजय गांधी किंवा वयोवृद्ध नागरिकांसाठी श्रावण बाळ इत्यादी मासिक पेन्शन योजना सुरू केली होती.

आणि आजही सुरू आहे. परंतु पीएम किसान योजनेचा ज्या पद्धतीने अत्यंत निर्लज्जपणे वाजा गाजा सुरू आहे असा वाजा गाजा आज पर्यंतच्या कोणत्याही सरकारने केला नाही. आपल्याकडे एक म्हण आहे. सोयऱ्याची मांडी झाकणे अर्थात जर नातेवाईक संकटात



असेल आणि विशेष म्हणजे आर्थिक अडचणीत असेल तेव्हा त्याच्याकडे जाऊन तिथे जर चार लोक असेल तर लोकांमध्ये न देता घरी गेल्यानंतर चुपचाप कुठलाही वाजा गाजा न करता पैशाची गड्डी हातात देणारा सोयरा अर्थातच मांडी झाकणारा म्हणजे खऱ्या अर्थाने आपल्या नातेवाईकाची अब्रू राखणारा. चारचौघांमध्ये त्याचा सन्मान करणारा. त्याला न दुखवता त्याच्या जखमेवर हळुवारपणे फुंकर घालून त्याला क्षणभर सुखविणारा असा प्रसंगी धीर गंभीर सोयरा म्हणजे मांडी झाकणारा. असा माणूस सर्वांना हवाहवासा असतो. फुलाचा सुगंध जसा न सांगताच फुलाची महती वाढवतो. अगदी त्याचप्रमाणे माणुसकीचे दर्शन घडणाऱ्या अशा व्यक्तीचा कार्यकर्तृत्वाचा सुगंध सगळीकडे दरवळत असतो. दुसरीकडे मात्र मदत करायची असेल तर तो एकांतात कधीच करणार नाही. तो चौकामध्ये सोयऱ्याला गाठून चारचौघात हे घ्या पैसे म्हणून आरोळी ठोकणारा. दिले ना पैसे म्हणत आपल्याच नातेवाईकाच्या जखमेचे खीपल काढून त्याला रक्तबंबाळ करणारा. त्याच त्या गोष्टीचा वाजा गाजा करत त्याच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणारा. असा माणूस हा गोड बोलणारा आणि काळीज तोडणारा असतो. त्यामुळे तो सर्वांना नको नकोसा असतो. आणि म्हणून असा व्यक्ती जरी संघाच्या शाखेतून संस्कार प्राप्त करून आलेला असेल तरीसुद्धा त्याला सुसंस्कृत म्हटल्या जात नाही. समाजातील एक विशिष्ट घटक सोडला तर सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने असा व्यक्ती गरजू माणसाच्या जखमेवर मीठ चोळणारा माणुसकीला पारखा असलेला कलंकित व्यक्ती म्हणूनच गनल्या जातो.

सध्या शेतकऱ्यांची परिस्थिती आतापर्यंतच्या सगळ्याच राज्यकर्त्यांनी त्या सोयऱ्यासारखीच अत्यंत दयनीय करून ठेवलेली आहे. वाढत्या महागाईने शेतकरी अत्यंत डबघाईस आला असून इज्जतीने जीवन जगणे त्याला कठीण झालेले आहे. परंतु आतापर्यंतच्या सरकारमध्ये असलेल्या प्रमुख व्यक्तींना थोडी तरी लाज शरम होती. परंतु सध्याच्या सरकारने आपली सगळी लाज शरम पूर्ण पणे विकून खाल्लेली आहे. शेतकऱ्याच्या खत आणि बियाण्यावरील सर्व सबसिडी काढून त्याच्या जखमेचं खीपल काढून त्याला रक्तबंबाळ केलेलं आहे. पेट्रोल डिझेल दरवाढ आणि जीएसटी सारखा टॅक्स लावून त्याच्या जखमेवर मीठ चोळलेलं आहे.

त्यातच भर म्हणून सत्ताधारी पक्षाचे काही कार्यकर्ते म्हणतात की जे लोक माननीय पंतप्रधानांच्या धोरणावर टीका करतात त्यांनी पी एम किसान सन्मान निधीचे 2000 रुपये परत करावे. अशा पद्धतीच्या चर्चेला उधाण आलेलं आहे. शेतकऱ्याची चेष्टा करणाऱ्या या तथाकथित कार्यकर्त्यांना राष्ट्रसंतांनी सावधानतेचा इशारा दिलेला आहे. "कोण कहता है ये माल सरकारी है ये तो जनता का है वो तो रखवारी है" खबरदार पि एम किसान सन्माननिधी योजनेचा पैसा हा सरकारच्या कुठल्याही प्रमुखाचा पैसा नसून हा या देशातल्या शेतकरी, कष्टकरी, कामकरी लोकांच्या घामाचा पैसा आहे. या संदर्भातली शिकवण ही संघाच्या शाखेत जरी दिली जात नसली तरी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मात्र आपल्या साहित्यातून दिलेली आहे. आणि म्हणून माननीय पंतप्रधानांनजी आपल्या किसान सन्मान योजनेला आपण राबवलेल्या हिनकस प्रचार तंत्रामुळे किसान अपमान निधी चे स्वरूप प्राप्त झालेले आहे. आणि म्हणून माझा तुम्हाला सवाल आहे की शेतकऱ्याची अशी क्रूर थट्टा कशासाठी ?

# समान नागरी कायदा लागू करण्यापूर्वी सर्वांना विश्वासात घ्या



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**देशात समान नागरिक कायदा लागू करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून त्या संदर्भातील हालचालींना वेग आला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी देशात समान नागरिक कायदा लागू होईल अशी अटकळ बांधली जात होती ती खरी होताना दिसत आहे कदाचित आगामी पावसाळी अधिवेशनातच या संदर्भातील विधेयक केंद्र सरकारतर्फे मांडले जाण्याची शक्यता आहे. देशात समान नागरिक कायदा लागू करावा ही आत्ताची मागणी नसून खूप जुनी मागणी आहे त्यावर वेळोवेळी चर्चा देखील झाली आहे मात्र यावेळी केंद्र सरकार हा कायदा मंजूर करून घेण्याच्याच पवित्र्यात दिसत आहे.**

म्हणूनच या मुद्द्यावरून देश ढवळून निघाला आहे. २२ व्या विधी आयोगाने समान नागरिक कायद्यासंदर्भात लोकांकडून सूचना व हरकती मागवल्या आहेत. त्याला लाखो लोकांनी प्रतिसाद देऊन हरकती व सूचना नोंदवल्या आहेत. काहिंनी या कायद्याच्या बाजूने मत दिले आहे तर काहींनी विरोधात. या कायद्यासंदर्भात केवळ जनतेतच नाही तर राजकीय पक्षात देखील मतमतांतरे आहेत विशेष म्हणजे ज्या विधी आयोगाने हा विषय हाती घेतला आहे त्यात देखील या विषयावर मतभिन्नता आहे. सध्याच्या २२ व्या विधी आयोगाच्या मते हा कायदा देशात लागू व्हायला हवा तर याआधीच्या म्हणजे २१ व्या विधी आयोगाने हा कायदा अनावश्यक असल्याचे मत व्यक्त केले होते. हा कायदा लागू करण्यामागे भाजपचा हेतू स्वच्छ नसल्याचा आरोप विरोधकांमार्फत केला जात आहे. समान नागरिक कायदा लागू करून हिंदू मुस्लिम धर्मीयांत तेढ निर्माण करणे व त्यावर २०२४ ची निवडणूक जिंकणे असा भाजपचा डाव असल्याचा आरोप विरोधक करत आहेत तर आपला देश एक कुटुंब असून एकाच कुटुंबातील सदस्यांसाठी वेगवेगळे कायदे असण्याचे कारण काय ? सर्वांसाठी एकच कायदा हवा असे मत भाजपचे आहे एकूणच समान नागरिक कायद्यासाठी संपूर्ण देशात अनेक मतमतांतरे आहेत म्हणूनच सरकारने हा निर्णय घाईत न घेता देशातील सर्व घटकांना विश्वासात घेऊनच घ्यायला हवा. मुळात समान नागरिक कायदा हा खूप गुंतागुंतीचा आहे. आपल्या देशात सर्व धर्मीयांना त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यानुसार विवाह, वारसाहक्क, दत्तक घेणे, घटस्फोट आदी विषयांवर आपापल्या धर्मानुसार निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. जर समान नागरिक कायदा लागू झाला तर विवाह, वारसाहक्क, दत्तक घेणे, घटस्फोट या




बाबींमध्ये सर्व धर्मीयांसाठी एकच कायदा लागू होईल. सध्या हिंदू, बौद्ध, जैन, शीख या धर्मीयांसाठी हिंदू विवाह कायदा लागू आहे तर मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मीयांसाठी वेगळे कायदे आहेत. केवळ मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मीयच नाही तर ईशान्य भारतामधील २०० जातींमध्ये देखील त्यांच्या परंपरेनुसार स्वतःचे कायदे आहेत. जर समान नागरिक कायदा लागू झाला तर त्यांचा देखील या कायद्यात समावेश होईल. या २०० जातींना संविधानाने संरक्षण दिले आहे जर त्यांचाही या कायद्यात समावेश झाला तर तेथील लोकांची तीव्र प्रतिक्रिया उमटेल. सध्या मणिपूर पेटले आहे अशावेळी जर हा निर्णय झाला तर त्या आगीत तेल ओतण्याचेच काम होईल. समान नागरिक कायदा लागू झाला तर शिक्षण आणि नोकऱ्यांमधील आरक्षण रद्द होईल असाही काहींचा समज आहे पण आरक्षण आणि समान नागरिक कायदा यांचा काहीही संबंध नाही. दोन्ही विषय वेगळे आहेत. समान नागरिक कायदा हा फक्त विविध धर्मीयांच्या विवाह विषयक धार्मिक कायद्यामध्ये समानता आणणे हा आहे मात्र हाच खरा कळीचा मुद्दा आहे त्यामुळे हा विषय सरकारने खूप गांभीर्याने हाताळायला हवा. कायदा लागू करण्यापूर्वी देशातील सर्व घटकांशी, राजकीय पक्षांशी तसेच धार्मिक नेत्यांशी चर्चा करायला हवी. कायद्यसंदर्भातील रुपरेषा या घटकांना समजावून सांगायला हवी. सर्वांना विश्वासात घेऊनच या कायद्यासंदर्भात पावले उचलायला हवीत. बळजबरीने किंवा जबरदस्तीने पाशवी बहुमताच्या जोरावर हा कायदा लागू केल्यास देशात अराजकता माजेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# बीआरएसने अवलंबिले अनोखे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** गडचांदूर बसस्थानकाचा प्रश्न बऱ्याच वर्षांपासून प्रस्तावित असताना आज भारत राष्ट्र समितीच्या वतीने मंजुरी न मिळालेल्या गडचांदूर बसस्थानकाला प्रतिकात्मक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बसस्थानक नाव देत भूषण फुसे यांच्या नेतृत्वात अनोखे आंदोलन करण्यात आले.

औद्योगिक शहर असलेल्या व चार चार सिमेंट उद्योग सभोवती असलेल्या शहरात तसेच जिवती व कोरपना तालुक्याची मूख्य बाजारपेठ असलेल्या शहरात बसस्थानक नाही. मागील कित्येक वर्षांपासून गडचांदूर येथे बसस्थानक निर्माण करण्यात यावे अशी नागरिकांची मागणी असतांना शासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

याकरिता आज दिनांक 11 ऑगस्ट रोजी गडचांदूर बस स्थानक परिसरात भारत राष्ट्र समिती च्या वतीने गडचांदूर बस स्थानक तात्काळ निर्माण करावे या मागणीसाठी प्रतिकात्मक गडचांदूर बसस्थानकाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव मा. एकनाथ शिंदे गडचांदूर बसस्थानक असे नाव देत अनोखे आंदोलन करण्यात आले आणि या मा. एकनाथ शिंदे गडचांदूर बसस्थानकाचे उद्घाटन जिवती ते गडचांदूर नेहमी प्रवास करणारे जिवती तालुक्यातील नागरिक रामराव शेळके व नंद आप्पा यांच्या हस्ते गडचांदूर बस स्थानकाचे लोकार्पण करण्यात आले.

या अनोख्या आंदोलनाने गडचांदूर करांचे लक्ष वेधले. आता तरी राज्यसरकाने या गंभीर विषयाची दखल घेऊन गडचांदूर बस स्थानक उभारणीला परवानगी घ्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. गडचांदूर बस स्थानक आंदोलन भारत राष्ट्र समितीचे नेते भूषण फुसे यांच्या नेतृत्वात घेण्यात आले यावेळी भारत राष्ट्र समितीचे नेते राकेश चिल्कुलवार अजय साकीनाला, सनी रेड्डी, धनंजय बोर्डे, महेंद्र ठाकूर, संघर्ष गडपिल्ली, प्रदीप इरकला. अश्विन वाघमारे व्यंकटेश जंजरला. सामाजिक कार्यकर्ते सुरज उपरे, कैलास चीतलवार. दिलीप कांबळे आदींची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# पोषण आहारातील डाळ, चटणी निकृष्ट

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम:** जिल्ह्यात वितरीत होत असलेल्या शाळेत पोषण आहारातील डाळ व चटणी अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचा मुद्दा जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग ठाकरे यांनी स्थायी समितीच्या सभेत उपस्थित करून लहान मुलांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कंत्राटदारावर पोलीस कारवाई करावी, अशी मागणी केली. त्यांनी चक्क सभागृहात निकृष्ट डाळ व खिचडी आणल्याने अधिकाऱ्यांची एकच चांगलीच धांदल उडाली. लहान मुलांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या कंत्राटदारावर पोलीस कारवाई करावी. अशी मागणी त्यांनी सभागृहात केली असता चौकशी करण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र जिल्ह्यात निकृष्ट पोषण आहाराचा मुद्दा चव्हाट्यावर आला आहे.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वसुमना पंत यांच्या दालनात निकृष्ट डाळ व चटणी नमुन्याची आज चौकशी करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रशासन या प्रकरणी काय भूमिका घेते याकडे लक्ष लागले आहे. जिल्ह्यात कंत्राटदाराकडून पुरवठा होत असलेल्या पोषण आहारातील साहित्यांची तपासणी करण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची आहे.



# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते स्टॉलचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'मेरी माटी-मेरा देश' ( माझी माती, माझा देश ) उपक्रम अंतर्गत चंद्रपूर जिल्हा परिषदेसमोर स्वंयसहायता समूहाच्या ध्वज विक्री स्टॉलचे उद्घाटन जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत ) कपिलनाथ कलोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( सामान्य ) श्याम वाखर्डे, जिल्हा अभियान व्यवस्थापक मनोहर वाकडे उपस्थित होते.

देशभरातील विरांच्या तसेच स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानार्थ पंतप्रधान यांनी 'मेरी माटी मेरा देश' हा उपक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत देशातील विरांचा सन्मान वाढावा तसेच राष्ट्रभक्ती वाढावी, याकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहेत. या उपक्रमांचा एक भाग तसेच स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेसमोर महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत स्वयंसहायता समुहाने ध्वज विक्री स्टॉल सुरू केला.

या स्टॉलचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी फित कापून उदघाटन केले. यावेळी उमेद अभियानातील जिल्हा व्यवस्थापक तसेच तालुका व्यवस्थापक यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. पंचायत समिती स्तरावरही याच स्वरुपाचे स्टॉल सुरू करण्यात येणार आहे, असल्याचे श्री. कलोडे यांनी कळविले आहे.

# रानभाजी महोत्सवात ३० प्रकारच्या भाज्या

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** लोकांमध्ये रानभाज्याबाबत ओळख, आरोग्य विषयक महत्व व जागृती करण्यासाठी शुक्रवारी पैठण पंचायत समिती कार्यालयात कृषी विभागाच्या वतीने रानभाज्या महोत्सव कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा 'आत्मा' तर्फे आयोजित केला होता. नियमित भाज्यांपेक्षा अधिक दर असताना रानभाज्यांना पसंती दिली जाते. या कारणामुळे मागील तीन वर्षापासून या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी संदिप सिरसाट यांनी दिली. रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन विलासबापु भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले. संदिप सिरसाट, तालुका कृषी अधिकारी, श्रीमती आशा बर्गे,तालुका तत्रज्ञान व्यवस्थापक उमेश तट्टू संचालक साई कृषी पैठण, आमोल फरसुडे, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक, प्रदिप शिंदे, सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक, तसेच कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती.

# गायीच्या पोटात चक्क ४० किलो प्लास्टिक

आधुनिक केसरी न्यूज


**नागपूर :** गोकुलम गोरक्षण संस्था येथे एका गायीच्या पोटातून चक्क ४० किलो प्लास्टिक शस्त्रक्रिया करून काढण्यात आले. प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी असताना मोठ्या प्रमाणात त्याचा वापर होत आहे. नंतर त्या कचऱ्यात फेकल्या जातात. त्या गायी खातात. त्यामुळे त्यांची प्रकृती बिघडण्याच्या घटना गेल्या काही दिवसांपासून वाढल्या आहेत. गायीच्या पोटावर शस्त्रक्रिया करून प्लॅस्टिक काढण्यात येते. अलीकडेच चाळीस किलो प्लॅस्टिक काढण्यात आले, असे संस्थेचे पदाधिकारी डॉ. सुनील सुर्यवंशी यांनी सांगितले.















# धुमसणाऱ्या मणिपूरचा आणखी किती अंत पाहणार ?



भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

आधुनिक केसरी

**मणिपूरमधील हिंसाचार थांबता थांबत नाही. मणिपूरमध्ये ३ मे रोजी मैतेई आणि कुकी जमात यांच्यात हिंसाचार उसळला होता. या दोन जमाती आपसात का भांडत आहेत? मणिपूर हिंसाचाराच्या आगीत जळून खाक झाले आहे. ५० हजारांहून अधिक लोकांना आपली घरे सोडून मदत छावण्यांमध्ये राहावे लागत आहे. कुकी आणि मैतेई यांच्यात सुरू असलेल्या वांशिक संघर्षात सरकारी आकडेवारीनुसार आतापर्यंत १६० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून ४५० लोक जखमी झाले आहेत. मणिपूरमध्ये दोन महिलांची खुलेआम नग्न धिंड काढल्याचा व्हिडिओ मे महिन्याच्या सुरुवातीचा असल्याचे सांगितले जात आहे. खरी अडचण ही आहे की, णिपूरमध्ये हिंसाचार सुरू झाल्यापासून तिथे इंटरनेट बंदी आहे. इंटरनेट बंद असल्याने तिथल्या अनेक गोष्टी आणि घटना समोर येत नाहीत. हिंसाचार नियंत्रणात आणण्यात मणिपूर सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे.**

**(मागील अंकावरून)** यांनी मे महिन्यात मणिपूरला भेट देऊन विविध समाजातील लोकांची भेट घेतली होती. पण त्यांच्या या भेटीचा मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने कोणताही परिणाम झालेला दिसत नाही. अशा परिस्थितीत पंतप्रधानांना पुढे येऊन राज्यात शांतता प्रस्थापित करण्याची प्रक्रिया सुरू करावी लागेल, तरच मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित होईल. समाजात फूट पाडून कोणाचे भले करायचे याचा विचार करण्याची गरज आहे. एकविसाव्या शतकात आपण प्रगतीचा विचार करायला हवा. प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचा विचार करायला हवा. तसे न करता केवळ जातीय आधारावर बोललो तर त्याचा देशाला किंवा राज्याला फायदा होणार नाही. आता फक्त मैतेईबद्दल बोलून चालणार नाही किंवा केवळ कुकी समाजाला अधिक महत्त्व देऊन चालणार नाही. या एकविसाव्या शतकातील गोष्टी नाहीत, या सर्व क्रूर काळातील गोष्टी आहेत. हा एक राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित मुद्दाही आहे, हे सरकारने समजून घेतले पाहिजे. मणिपूरमध्ये मानवी हक्कांचे इतके उल्लंघन होत आहे, ज्याची आपण कल्पनाही करू शकत नाही. व्हायरल झालेला हा व्हिडिओ तीन महिन्यांपूर्वीचा आहे, त्यामुळे यावरून मणिपूरमध्ये किती घटना घडल्या असतील याचा अंदाज येऊ शकतो. मणिपूर हिंसाचारावर मुख्य प्रवाहातील माध्यमे किती बोलत आहेत ते पाहा. मणिपूरच्या जनतेला सध्या काय भोगावे लागत आहे, असा प्रश्न कोण उपस्थित करणार ? माध्यमांशी संबंधित लोकांनी हे समजून घेतले पाहिजे. तीन महिन्यांनंतरही मणिपूरमधील हिंसाचार थांबत नाही, याचे मुख्य कारण सरकारची अकार्यक्षमता हेच आहे. हिंसाचार करणाऱ्यांना सरकारने अटक करून त्यांच्यावर कारवाई केली असती, मग ते कुठल्याही समाजाचे असोत, तर हिंसाचार आतापर्यंत थांबला असता. मणिपूर हिंसाचार सुरू होऊन अनेक दिवस झाले आहेत. यावर आज पंतप्रधान बोलत आहेत. जर



ते आधी बोलले असते तर कदाचित त्याचा परिणाम दिसला असता आणि मणिपूर हिंसाचार लवकर संपला असता. मणिपूरच्या जनतेला काय सहन करावे लागत आहे, याबद्दल कोणीही गांभीर्याने बोलत नाही. इथल्या लोकांना असेच वाऱ्यावर सोडले गेले आहे.

मणिपूरमध्ये तीन महिन्यांहून अधिक काळ सुरू असलेल्या हिंसाचारामुळे एका पक्षाने एन बीरेन सिंह सरकारमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. एनडीएचा मित्रपक्ष असलेल्या कुकी पीपल्स अलायन्सने मणिपूरमधील एन बिरेन सिंह सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. कुकी पीपल्स अलायन्सचे (केपीए) दोन आमदार आहेत. केपीएचे प्रमुख टोंगमांग यांनी पत्रात म्हटले आहे की, सध्याच्या संघर्षाचा व्यापकपणे विचार केल्यानंतर, मणिपूरचे मुख्यमंत्री एन बीरेन सिंह यांच्या नेतृत्वाखालील विद्यमान सरकारला पाठिंबा कायम ठेवण्यात अर्थ नाही. ते पुढे असेही म्हणतात की, केपीए मणिपूर सरकारला दिलेला पाठिंबा काढून घेत आहे. ६० सदस्यांच्या मणिपूर विधानसभेत कुकी पीपल्स अलायन्सचे दोन आमदार (सायकुलमधून के. एच. होंगशिंग आणि सिंघाटमधून चिनलुंगथांग) आहेत. मणिपूर विधानसभेत कुकी-जोमी समाजाचे १० आमदार आहेत, त्यात भाजपचे सात, कुकी पीपल्स अलायन्सचे दोन आणि एक अपक्ष आमदार आहे. मणिपूरचा कुटील राजकीय डावपेचाने बळी घेतला आहे हेच खरे! (लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)

# सायलेंट किलर आजार!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**रक्तदाब हा अभिसरण होत असलेल्या रक्ताद्वारे रक्तवाहिन्यांच्या आतील भिंतींवर पडणारा दबाव होय. धमन्या या हृदयातून शरीरातल्या सर्व उती आणि अवयवांना रक्तपुरवठा करतात. हृदयातून धमन्यांमधे रक्त ढकलले जाण्यामुळं आणि धमन्यांद्वारे या रक्ताच्या प्रवाहाला दिला जाणारा प्रतिसाद यांच्या परिणामाने रक्तदाब निर्माण होतो. परंपरेनुसार, एखाद्या व्यक्तीचा रक्तदाब हा सिस्टॉलीक/ डायस्टॉलीक असा व्यक्त केला जातो, उदाहरणार्थ- १२०/८०. हृदयाचे स्नायू आकुंचन पावून धमन्यांमधे रक्त ढकलले जाते तेव्हा धमन्यांच्या आतल्या भिंतीवर निर्माण झालेला दाब म्हणजे सिस्टॉलीक रक्तदाब होय. आकुंचनानंतर हृदयाचे स्नायू शिथील होतात त्यावेळेला धमन्यांमधील दाब म्हणजे डायस्टॉलीक रक्तदाब होय. हृदय जेव्हा रक्त पंप करत असतं त्यावेळेला रक्तदाब हा उच्च असतो, ते शिथिल असतं तेव्हा नाही. बहुतांश सुदृढ प्रौढांसाठी सिस्टॉलीक रक्तदाब हा पा-याच्या ९० आणि १२० मिलीमीटर्स दरम्यान असतो.**

सामान्य डायस्टॉलीक रक्तदाब हा ६० आणी ८० दरम्यान असतो. विद्यमान मार्गदर्शक सूचनांनुसार सामान्य रक्तदाब हा १२०/८० पेक्षा कमी असल्याचे सांगितले जाते. आपण डॉक्टर नाही, परंतु समाजात बिपीमुळे अनेकांची होत असलेली जीवीत हानी बघवत नाही, म्हणून हा जागरूकतेसंबंधी लेख प्रपंच!

कमी रक्तदाब- हायपोटेन्शनः हा एक इतका कमी असलेला दाब असतो की त्यामुळं धमन्या आणि शिरांमधून वाहणा-या कमी रक्तप्रवाहामुळं लक्षणं आणि चिन्हं दिसतात. हा कमी रक्तप्रवाह मेंदू, हृदय आणि मूत्रपिंड यासारख्या महत्वाच्या अवयवांना पुरेसा ऑक्सिजन आणि पोषक तत्वं पुरवण्यास इतका कमी पडतो की, हे अवयव सामान्यपणे काम करू शकत नाहीत आणि त्यांचं कायमचे नुकसान होऊ शकतं. उच्च रक्तदाबाच्या तुलनेत, कमी रक्तदाब हा कमी रक्तप्रवाहाच्या चिन्हं आणि लक्षणांनी प्रामुख्यानं व्यक्त केला जातो, विशिष्ट रक्तदाब संख्येनं नाही. काही व्यक्तींना ९० /५० असा कमी रक्तदाब असू शकतो आणि त्यांना कमी रक्तदाबाची कोणतीही लक्षणं दिसत नाहीत आणि त्यामुळं त्यांना कमी रक्तदाब दिसत नाही. तथापि, ज्यांना सामान्यतः उच्च रक्तदाब असतो, त्यांचा रक्तदाब १००/ ६०च्या खाली गेल्यास त्यांना कमी रक्तदाबाची लक्षणं दिसू शकतात. कमी रक्तदाबामुळं डोकं हलकं वाटणे, चक्कर येणे, किंवा उभे राहिल्यानंतर मूर्च्छा येणे अशी लक्षणं निर्माण झाल्यास, त्याला ऑर्थोस्टॅटीक हायपोटेन्शन म्हणतात. सामान्य व्यक्ती उभं राहण्यामुळं निर्माण झालेला कमीदाब हा जलदगतीनं भरुन काढू शकतात. हृदय रोहिणींना- हृदयाच्या स्नायूंना रक्त पुरविणाऱ्या रक्तवाहिन्या रक्त पुरविण्यास जेव्हा रक्तदाब हा अपुरा पडतो तेव्हा, त्या व्यक्तीला छातीत वेदना किंवा हृदयविकाराचा झटकाही येऊ शकतो. मूत्रपिंडांना जेव्हा अपुरं रक्त पुरवलं जातं, तेव्हा मूत्रपिंडही शरीरातून टाकाऊ पदार्थ बाहेर काढू शकत नाहीत, उदाहरणार्थ- युरिया, क्रिएटीनाईन आणि त्यांची रक्तातील पातळी वाढते. झटका बसणे ही जीवाला घातक अशी स्थिती असून सातत्यानं कमी रक्तदाब राहिल्यानं मूत्रपिंडं, यकृत, हृदय, फुफ्फुसं, आणि मेंदूचं कार्य झपाट्यानं खालावतं.

उच्च रक्तदाबः रक्तदाब नियंत्रित असणे हे केव्हाही चांगले; पण उच्च रक्तदाब असलाच तर तो नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करावा. उच्च रक्तदाब सतत राहिला तर त्याचा विविध अवयवांवर दुष्परिणाम होतो. आपला रक्तदाब म्हणजे काय ? तो किती असावा ? आणि कसा मोजावा ? आज आपण उच्च रक्तदाब म्हणजे काय, तो कसा ओळखायचा आणि त्याला कसे हाताळायचे हेही बघूया. आपला रक्तदाब सामान्यापेक्षा जास्त असेल आणि नेहमीच जास्त असेल तर त्याला आपण उच्च रक्तदाब म्हणतो. सामान्य रक्तदाब हा १२० सिस्टोलिक आणि ८० डायस्टोलिक (१२०/८०) एवढा किंवा यापेक्षा कमी असतो. जर आपला रक्तदाब सतत १४० /९० यापेक्षा जास्त असेल तर त्याला आपण उच्च रक्तदाब म्हणतो. यासाठी डॉक्टर कमीत कमी दोन-तीन वेळा आपला रक्तदाब तपासून बघतात आणि आपल्या उच्च रक्तदाबाचे निदान करतात. रक्तदाब खूप जास्त वाढला असेल, तर लवकरसुद्धा निदान करता येते. रक्तदाबाचे निदान कसे करायचे, हे आपण याआधी बघितलेच आहे. उच्च रक्तदाब असेल तर आपण कसे हाताळायचे, ते आज आपण बघूया. उच्च रक्तदाब ओळखायचा कसा ? लक्षणांवरून उच्च रक्तदाब ओळखणे फारच कठीण आहे. उच्च रक्तदाबाची वेगळी अशी लक्षणे बरेचदा दिसत नाहीत. काही लोकांमध्ये छातीत जड वाटणे, डोके दुखणे अशी काही लक्षणे दिसू शकतात; पण ही लक्षणे फक्त उच्च रक्तदाबाची नसतात. इतर आजारांमध्येसुद्धा अशी लक्षणे दिसतात, त्यामुळे फक्त लक्षणांवरून आपण उच्च रक्तदाबाचे निदान करू शकत नाही. काही लोकांचा रक्तदाब खूप वाढला तरीही त्यांच्यामध्ये लक्षणे मुळीच दिसत नाहीत.

काही रुग्णांना तर अगदी हृदयविकाराचा झटका आल्यावर किंवा अर्धांगवायूचा झटका आल्यावर दवाखान्यात भरती केले जाते आणि तेव्हा त्यांना उच्च रक्तदाब असल्याचे निदान होते. कुठलेही लक्षण दिसत नसल्यामुळे या आजाराला सायलेंट किलर असे म्हटले जाते. अशा सायलेंट किलर आजाराचे निदान रक्तदाब मोजल्यावर होते. म्हणून नियमितपणे रक्‌तदाब मोजणे हे फार आवश्यक आहे. दरवर्षी एकदा तरी आपला रक्तदाब मोजायला हवा. जास्त धोका कोणाला ? तर, ज्या व्यक्तींच्या जवळच्या नातेवाइकांना म्हणजेच आई-वडील, भाऊ-बहीण इत्यादींना उच्च रक्तदाब आहे, त्यांनी जास्त काळजी घ्यावी. ज्यांच्या पोटाचा घेर वाढलेला आहे, ज्यांची ढेरी दिसते किंवा वजन वाढलेले आहे, अशा व्यक्तींनीसुद्धा जास्त काळजी घ्यावी. आपली जीवनशैली बैठी असेल, आपण नियमित व्यायाम करत नसू, आपल्याला धूम्रपान किंवा नियमित मद्यपान अशा सवयी असतील, तर आपल्याला उच्च रक्तदाब होण्याचा धोका जास्त आहे, असे समजावे. अशा व्यक्तींनी आपल्या रक्तदाबाकडे दुर्लक्ष करू नये. काही लोकांचे उच्च रक्तदाबाचे निदान झालेले असते, त्यांचा रक्तदाब वाढलेला असूनही काही त्रास होत नाही म्हणून ते याकडे दुर्लक्ष करतात. असे करू नये. कारण आपला रक्तदाब खूप काळासाठी वाढलेला राहिला, तर त्याचा आपल्या आरोग्यावर खूप मोठा विपरीत परिणाम होऊ शकतो. रक्तदाबाच्या लक्षणांवर भर न देता रक्तदाबाच्या आकड्याकडे आपण लक्ष देणे आवश्यक ठरते. उच्च रक्तदाब धोकादायक का ? तर, उच्च रक्तदाबामुळे आपल्याला शारीरिक त्रास होताना दिसत नाही. कुठेही दुखत नाही. पण, सतत रक्तदाब जास्त राहिला तर त्याचा विपरीत परिणाम आपल्या सगळ्याच रक्तवाहिन्यांवर होतो. शिवाय, हृदयावरसुद्धा याचा विपरीत परिणाम होतो. काही वर्षांच्या कालावधीनंतर आपल्याला हे दुष्परिणाम त्रासाच्या स्वरूपात जाणवायला लागतात. रक्तवाहिन्या आपल्या शरीरभर असतात, त्यामुळे हे त्रास आपल्याला शरीरभर जाणवायला लागतात. आपल्या हृदयावर सतत उच्च रक्तदाबाचा ताण असेल तर हृदयाची कार्यक्षमता कमी होते. यामुळे हृदय निकामी होऊ शकते. याला इंग्रजीमध्ये हार्ट फेल्युअर असे म्हणतात. सतत उच्च रक्तदाब जास्त असेल, तर हृदयाच्या रक्तवाहिन्यासुद्धा निकामी होतात आणि असे झाले, की आपल्याला हृदयविकाराचा झटका किंवा हार्ट अटॅक येण्याची



शक्यता असते. मेंदूच्या रक्तवाहिन्या जर निकामी झाल्या, तर त्यामुळे अर्धांगवायूचा अटॅक किंवा स्ट्रोक येण्याची शक्यता असते. उच्च रक्तदाब असेल तर हृदयाच्या रक्तवाहिन्या फुटून मेंदूमध्ये रक्तस्राव होण्याचीसुद्धा शक्यता असते, त्यामुळे सतत रक्तदाब वाढलेला असेल तर आपल्या मेंदूचे आरोग्यसुद्धा धोक्यात येते. रक्तवाहिन्यांवर दाब येऊन त्या खराब झाल्या तर आपल्याला मूत्रपिंडाचे आजारसुद्धा उद्‌भवतात. किडनी फेल्युअर किंवा मूत्रपिंड निकामी होणे असा गंभीर आजारसुद्धा होऊ शकतो. आपल्या डोळ्यांमध्ये ज्या बारीक रक्तवाहिन्या असतात, त्यांच्यावर रक्तदाबाचा परिणाम मोठ्या प्रमाणात दिसून येतो, त्यामुळे सतत रक्तदाब वाढलेला असेल, तर डोळेसुद्धा निकामी होऊ शकतात. अशा पद्धतीने आपल्या शरीरातील वेगवेगळ्या भागांवर उच्च रक्तदाबाचा परिणाम होतो. जेव्हा हा परिणाम होतो आणि त्याची लक्षणे दिसायला लागतात, तेव्हा बराच उशीर झालेला असतो, हे आजार बरेचदा ठीक करण्यासारखे नसतात किंवा पूर्णपणे ठीक होत नाहीत, त्यामुळे आपण उच्च रक्तदाब याचे वेळेत निदान करून त्याला नियंत्रणात ठेवणे हे फार आवश्यक असते. आपल्याला उच्च रक्तदाब असेल तरीही आपला रक्तदाब हा जास्तीत जास्त काळ सामान्य राहील, यासाठी आपण प्रयत्न करावा. हे बरेच कठीण असले तरीही रक्तदाब कमी राहिला, तर त्रास टाळता येतात. उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णाचा रक्तदाब १४०/९० यापेक्षा कमी ठेवणे हे आपले लक्ष्य असते. ज्या व्यक्तीला रक्तदाबासोबत मधुमेहसुद्धा आहे त्यांचा रक्तदाब यापेक्षासुद्धा कमी म्हणजे १३०/ ८० ठेवण्याचा आपला प्रयत्न असतो. काही लोकांना हृदयविकाराचा धोका इतरांपेक्षा जास्त असतो, अशा व्यक्तींमध्येसुद्धा बीपी सामान्य ठेवण्याचा प्रयत्न करतो. अशा व्यक्तींमध्येही आपले लक्ष्य १३०/८० असे असते. उच्च रक्तदाब का होतो ? तर, आपला रक्तदाब बऱ्याच घटकांवर अवलंबून असतो आणि हे घटक जसे बदलतात, तसा आपला रक्तदाब बदलतो. पण, सतत रक्तदाब वाढलेला राहण्याची काही विशिष्ट कारणे असतात. हृदय आणि रक्तवाहिन्यांच्या काही आजारांमध्ये कधीकधी रक्तदाब वाढतो, त्याखेरीजही काही लोकांमध्ये शारीरिक आजार असतात आणि या आजारांमुळे आपल्या रक्तदाबावर परिणाम होतो व आपला रक्तदाब सतत वाढलेला राहतो.

मूत्रसंस्थेचे आजारः मूत्रपिंडामध्ये जर काही बिघाड झालेला असेल तर त्यामुळे आपला रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास अडचण येते आणि रक्तदाब वाढायला लागतो. मूत्रपिंडाच्या आजाराशिवाय मूत्रपिंडाच्या रक्तवाहिन्यांचेसुद्धा आजार असतात. मूत्रपिंडाच्या रक्तवाहिन्यांमध्ये जर काही खराबी असेल किंवा त्या बंद पडल्या, तर त्यामुळेही रक्तदाब वाढू शकतो. रक्तदाब सतत वाढलेला असेल तर मूत्रपिंडाचे आजार होतात आणि मूत्रपिंडाचा आजार असेल, तर त्यानेसुद्धा रक्तदाब वाढतो हे असे दुहेरी समीकरण आहे.

हार्मोन्सचे आजारः आपल्या शरीरामध्ये रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी बऱ्याच हार्मोन्सचा (संप्रेरक) सहभाग असतो. हे हार्मोन्स वेगवेगळ्या ग्रंथींमधून तयार होत असतात. या हार्मोन्समध्ये जर काही बिघाड झाला तर त्यामुळेसुद्धा आपल्याला उच्च रक्तदाबाचा आजार होऊ शकतो. थायरॉईड ग्रंथीचे आजार, कॉर्तीसोल या हार्मोन्सचे आजार या सगळ्यामुळे आपल्याला उच्च रक्तदाब होऊ शकतो.

औषधेः काही रुग्णांमध्ये एखाद्या वेगळ्या आजारासाठी काही औषधे दिली जातात; पण त्यांचा रक्तदाबावर विपरीत परिणाम होतो आणि रक्तदाब वाढू शकतो.

इतर आजारांशिवाय होणारा रक्तदाबः आपल्या शरीरामध्ये कुठलाही आजार नसताना आपला रक्‌तदाब वाढू शकतो, याला आपण प्रायमरी हायपर टेन्शन किंवा इसेन्शियल हायपरटेंशन असे म्हणतो. बऱ्याच तपासण्या करूनसुद्धा आपल्या शरीरामध्ये कुठलाही आजार दिसत नाही; पण रक्‌तदाब वाढलेला असतो. असे होण्याची काय कारणे आहेत ? हे बरेचदा आपल्याला शोधूनसुद्धा सापडत नाहीत. याला आपण इसेन्शिअल हायपरटेन्शन म्हणतो. यामागे आनुवंशिकता व आपली शारीरिक ठेवण याचा थोडा वाटा असतो.

जीवनशैलीमुळे होणारा उच्च रक्तदाबः काही वेळेस आपल्या आनुवंशिकतेपेक्षा आपल्या जीवनशैलीचा परिणाम आपल्या रक्तदाबावर जास्त होतो. आपले वजन वाढले किंवा शरीरातील चरबी वाढली तर त्याचा परिणाम आपल्या शरीरावर होऊनसुद्धा रक्तदाब वाढतो. * आपली बैठी जीवनशैली असेल * व्यायामाचा अभाव असेल * वजन वाढलेले असेल * झोप पुरेशी होत नसेल * व्यसने असतील, या कारणांमुळेही उच्च रक्तदाब होतो. याला जीवनशैलीशी निगडित रक्तदाब असे आपण म्हणू शकतो. अशाप्रकारे आजारांशी संबंधित उच्च रक्तदाब, जीवनशैलीशी संबंधित उच्च रक्तदाब आणि कुठलेही कारण न सापडता असणारा उच्च रक्तदाब असे आपण ढोबळमानाने विभाजन करू शकतो. निदान झाल्यावर काय करावे ? तर, उच्च रक्तदाबाचे निदान झाल्यावर डॉक्टर काही तपासण्या सांगतात.

यामध्ये रक्ताच्या तपासण्या आणि लघवीच्या तपासण्या असतात- ० आपल्या साखरेची पातळी कशी आहे ? ० कोलेस्टेरॉलची पातळी कशी आहे ? ० लघवीमध्ये काही दोष आहे का ? ० हृदयाचा आलेख कसा आहे ? कधी कधी हार्मोन्सच्या तपासण्या, हृदयाची एको तपासणी करावी लागू शकते. या तपासण्या आपले आरोग्य कसे आहे ? आपल्याला हृदयविकाराचा धोका किती आहे ? किंवा उच्च रक्तदाबामुळे कितपत धोका आहे ? याची अधिक माहिती देतात. यावरून डॉक्टर उपचार सुचवतात. इतर आजारांमुळे आपल्याला उच्च रक्तदाब झालेला असेल, तर अशा वेळी मूळ आजारावर उपचार करणे आवश्‌यक असते. अशा आजारावर उपचार झाला तर रक्तदाब नियंत्रणात यायला मदत होते. उदाहरणार्थ- जर एखाद्या हार्मोनच्या ट्यूमरमुळे रक्तदाब वाढलेला असेल, तो काढल्यावर रक्तदाब नियंत्रणात येतो. पण बहुतांशी व्यक्तींमध्ये उच्च रक्तदाब हा कुठल्याही आजाराशिवाय झालेला असतो. त्याचा उपचार हा जीवनशैलीतील बदल आणि औषधोपचार अशा दोन मार्गांनी करावा लागतो. **क्रमशः**

# उमेदवारांनी 'जगाव की मरावं'



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**राज्याच्या महसूल विभागाने तलाठी पदांची मेघाभरती करण्याचा निर्णय घेतला होता. याकरीता राज्यभरातील 4644 पदे भरण्यासाठी जाहिरात काढली होती.या परिक्षेसाठी अर्ज भरतांना खुल्या वर्गातील उमेदवारांसाठी 1 हजार रुपये तर इतर वर्गातील उमेदवारांसाठी 900 रूपये परीक्षा शुल्क आकारले होते. 4644 पदासाठी राज्यभरातून तब्बल 11 लाख 50 हजार 265 उमेदवारांनी अर्ज भरले. वाढत्या बेरोजगारीमुळे लाखोच्या संख्येने उच्चशिक्षितांनी सुध्दा तलाठीच्या स्पर्धा परीक्षेत भाग घेण्याकरिता अर्ज केले होते. यामध्ये अभियांत्रिकी, व्यवस्थापन, संगणक शास्त्र, विज्ञान, कला, वाणिज्य आदी शाखांमधील पदव्युत्तर पदवीधारकांचाही यात मोठ्या प्रमाणात समावेश होता.**

यामुळे सरकार जवळ तब्बल 100 कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल जमा झालेला आहे.आता महाराष्ट्र सरकारने ग्रामीणविकास विभागांतर्गत राज्यातील 34 जिल्हा परिषदांमधील गट "क" मधील सरळसेवेची 18 संवर्गातील तब्बल 19 हजार 460 पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा परिक्षा शुल्काचा विषय ऐरणीवर आला असून एका उमेदवाराने पात्र ठरणाऱ्या तीन ते पाच संवर्गासाठी अर्ज करण्याचा विचार केला तर त्याला तब्बल 5000 हजार रुपयांचे परीक्षा शुल्क भरावे लागणार आहे.याला सरकारकडुन बेरोजगार उमेदवारांची खुली महालुटच म्हणावी लागेल.येवढा पैसा बेरोजगार उमेदवारांजवळ येणार कोठुन यांचा थोडासाही विचार सरकारने केलेला नाही ही महाराष्ट्र सरकारची शोकांतिका म्हणावी लागेल.एका बाजूला केंद्रित लोकसेवा आयोगाच्या( युपीएसएसी ) परीक्षांचे शुल्क 100 तर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ( एमपीएससी ) परीक्षांचे शुल्क 350 रूपये इतकी आहे म्हणजेच जिल्हाधिकारी होण्यासाठी 100 रूपये लागत आहे,तर तलाठी व जिल्हा परिषदमधील इतर पदांसाठी 1000 रूपये मोजावे लागतात ही महाराष्ट्र सरकारच्या बाबतीत बेरोजगारांबद्दलची दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल.तलाठी पदांच्या 4644 पदासाठी राज्यभरातुन तब्बल 11 लाख 50 हजार 265 उमेदवारांनी अर्ज भरले यात सरकार जवळपास 100 कोटी रुपयांचा महसुल जमा झाला. अशीच परिस्थितीत जर जिल्हा परिषद भरतीची रहाली तर एका संवर्गासाठी 19 हजार 460 पदासाठी कमीत कमी 48 लाख 26 हजार 80 पेक्षा जास्त उमेदवारी अर्ज येवू शकतात आणि जास्त संवर्गातील पदांसाठी अर्ज केला तर यांच्या पेक्षा चापटीने अर्ज येतील. यापासून सरकारला जवळ जवळपास 1000 कोटी रुपयांपेक्षा जास्त महसुल जमा होवू शकतो.राज्य शासनाने 21 नोव्हेंबर 2022 च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट- ब,क आणि ड संवर्गातील पदांच्या भरतीसाठी "टीसीएस" आणि "आयबीपीएस" या कंपन्यांची निवड केली आहे. सरकारने खाजगी कंपन्यांना परीक्षा घेण्यासाठी का आमंत्रित करावे ? बेरोजगारांच्या परीक्षांच्या बाबतीत सरकार कमकुवत झाली का ? सरकार काय धंदा करण्यासाठी बसली आहे का ? प्रायव्हेट कंपन्यांना मोठे करण्यासाठी सरकार बसली आहे का ? टीसीएस किंवा आयबीएस कंपनी 100 रूपये का घेत नाही ?असा विचार आज सर्वसामान्यांच्या मनात घुमजाव करीत आहे.हा मोठा गंभीर विषय आहे यावर सरकारने गांभीर्याने विचार करायला हवा.1000-900 रूपये घेणे म्हणजेच सरसकट सरकार कडून बेरोजगारांची लूटच म्हणावी लागेल.कारण प्रत्येक उमेदवाराजवळ 1000 किंवा 900 रूपये जमेलच हे कशावरून ? कारण उमेदवारांना अर्जासोबत फी भरायची आहे ती वेगळी बाब,परीक्षेच्या ठिकाणी जाण्या-येण्याचा खर्च वेगळा, शिक्षणाचा खर्च वेगळा अशा प्रकारे उमेदवारांच्या खर्चाचा व्याप वाढतो व त्याचा फटका पालकांना सहन करावा लागतो.सर्वच उमेदवार किंवा उमेदवारांचे पालक श्रीमंत आहेत किंवा सर्वांची ऐपत पैसे भरण्याची आहे असे कदापि नाही ही बाब सरकारने चांगल्याप्रकारे लक्षात ठेवली पाहिजे. कोणतीही स्पर्धापरीक्षा असो त्याची शुल्क उमेदवारांकडून फक्त 100 रूपये आकारायला



पाहिजे. परीक्षा टीसीएसने घेतली किंवा आयबीपीएसने घेतली तरी चालेल.कारण बेरोजगार हा हताश झालेला असतो आणि त्यात जिल्हा परिषद भरती असो अथवा कोणत्याही स्पर्धापरीक्षा असो याकरीता 1000 किंवा 900 रूपये एवढी अवाढव्य शुल्क आकारने म्हणजे सरकार मार्फत बेरोजगारांची खुली लुटच म्हणावी लागेल.राज्यात मोठ-मोठे घोटाळे होतात त्यातली वसुल झालेल्या रक्कमेतून सरकारने बेरोजगार उमेदवारांच्या कामात आणावी.राज्यांच्या आमदार-खासदार, मंत्री यांच्यावर सरकार मार्फत होणारा अवाढव्य खर्च सरकारने कमी करावा व बेरोजगारांना स्पर्धा परीक्षेत मदत करावी.कारण मुठभर राजकीय पुढाऱ्यांच्या चुकीच्या पध्दतीमुळे बेरोजगारांचे वाटोळे होत आहे.जिल्हा परिषद भरती पदांच्या फक्त 19460 पदे आहेत व याकरीता उमेदवारांचे अर्ज अंदाजे जवळपास 48 लाख 26हजार 80 पेक्षा जास्त येवू शकतात.यातुन 48 लाख 6 हजार 620 उमेदवार बाहेर होणार व त्यांच्या नशिबी निराशा येणार हे नक्कीच व त्यांचे 1000 ते 900 रूपये वाया जाणार हे सुद्धा तितकेच सत्य आहे याचाही विचार सरकारने गांभीर्याने केला पाहिजे.कारण स्पर्धा परीक्षांची शुल्क जास्त असल्याने अनेक उमेदवार अर्जही करीत नाही किंवा भरत नाही ही वस्तुस्थिती आहे आणि जे अर्ज करतात ते अवाढव्य शुल्क पाहून दोन-तीन परीक्षा देतात यातही निराशा हाती आली तर पुढील परीक्षांचा विचार सुध्दा करीत नाही. त्याचप्रमाणे आपल्याला असे उमेदवार सुध्दा दिसून येतात की नोकरीच्या आशेने उसने-वाडी पैसे घेऊन अर्ज भरतांना सुध्दा दिसतात या सर्व गोष्टींचा विचार सरकारने गांभीर्याने करने गरजेचे आहे.

सर्वांजवळ पैसा आहे ही सरकारची चुकीची कल्पना आहे.त्यामुळे बेरोजगारांच्या संबंधातील कोणत्याही स्पर्धापरीक्षा असो त्याचे शुल्क फक्त 100 रूपयेच असायला हवे असे मला वाटते. यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची अत्यंत गरज आहे.सरकारने हेही लक्षात ठेवले पाहिजे की उमेदवारांचे शुल्क कमी केल्याने सरकारची तिजोरी रिकामी होणार नाही तर भरेल व बेरोजगार उमेदवारांना प्रोत्साहन मिळेल. त्याचप्रमाणे कोणत्याही निवड प्रक्रियेवर सरकारने स्थगिती देवू नये.कारण यामुळे बेरोजगार उमेदवारांच्या मनावर विपरीत परिणाम होतो.या सर्वच बाबींचा सरकारने गांभीर्याने विचार करून पुढे येणाऱ्या संपूर्ण बेरोजगारांबद्दलच्या ( नौकरी बद्दलच्या ) स्पर्धा परीक्षांचे शुल्क फक्त 100 रूपयेच करावे.महाराष्ट्रातील राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडोंची संपत्ती आहेच यात दुमत नाही.याचा अर्थ सर्वच श्रीमंत आहे असे होत नाही.परंतु सरकारी आकडेवारीनुसार महाराष्ट्रातील 284 आमदारांची सरासरी संपत्ती 23.51 कोटी रुपयांची आहे ही बाब त्यांच्या निवडणूक स्वयंघोषणापत्रकातून स्पष्ट झाले आहे.त्यामुळे सरकारने बेरोजगारांकडुन होणारी लूट ताबडतोब थांबवली पाहिजे.याकरीता सरकारने यावर जातीने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

# विकृतींना संस्कृती समजणारे लोक



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र हा फुले शाहु आंबेडकरांचा आहे. फुले शाहु आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुतेवर आधारित समाज रचना निर्माण करून हजारो वर्षांपासून चालत आलेल्या एकाच वर्णाच्या मक्तेदारीला व उच्च निच्चतेला सुरूंग लावला व माणसाला माणुस म्हणून जगण्याचा अधिकार निर्माण करून दिला. समता, बंधुता, न्याय यावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करणारे व विषमता, जातीवाद, द्वेष, अंधविश्वास नष्ट करून सामाजिक समता व विज्ञानवादी दृष्टिकोन देणारे महापुरुष आजही ब्राम्हणांना ब्राम्हणांचे शत्रू वाटतात. इतिहास बघितला तर अनेक वर्षापासून देशात ब्राह्मण व ब्राम्हणेत्तर संघर्ष सुरुच आहे. ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर यांचा संघर्ष होण्यामागे मुख्य कारण हेच होते कि ब्राह्मण वर्ग स्वतः चे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी जातीव्यवस्था, विषमता, द्वेष व अंधविश्वास मजबूत करून लोकांच्या मुलभूत हक्कांचे हनन करून आर्थिक व माणसिक शोषण करत होते.**

ब्राम्हणांना लोकांना जागृत करून नाही तर अंधविश्वासात ठेवून त्यांना माणसिक गुलाम करण्यामध्ये श्रेष्ठत्व वाटते. इतिहासाचा विचार केला तर ब्राम्हणांनी सुरवातीला वर्ण व्यवस्था व नंतर जातीव्यवस्था मजबूत करून धार्मिक ग्रंथामधुन ब्राम्हणांना श्रेष्ठ ठरवून ब्राम्हणेत्तरांना मात्र गुलामच ठेवले. थोडक्यात काय तर समता, बंधुता, न्याय, अंधविश्वास यावर बोलले तर ब्राह्मण विरोध कसा होऊ शकतो ? जर समता, बंधुता, न्याय अंधविश्वास यावर बोलल्याने ब्राह्मण विरोध किंवा धर्म विरोध होत असेल तर ब्राम्हण हे विषमता वादी आहेत अस माणायच का ? जर समता व मानवतावादी वादी आहेत तर समता, बंधुता, न्याय, पाखंड यावर बोलले की काही ब्राम्हणांना आजही का खटकते ? आज शिक्षणाच्या माध्यमातून ब्राम्हणासोबतच ब्राम्हणेत्तर लोकही शिकुन जागृत झाले आहेत. हजारो वर्षापासून ज्या ग्रंथाचा आधार घेऊन ब्राम्हणेत्तर लोकांवर हुकुमत केली जायची त्या ग्रंथामध्ये विषमता, द्वेष, पाखंड लिहून ठेवले आहे. आज शिक्षणाच्या माध्यमातून ब्राम्हणेत्तर लोकांना ते कळायला लागले. जर हजारो वर्षा पुर्वी लिहलेल्या ग्रंथात चुकिच्या गोष्टी असतील तर त्या मध्ये काळानुसार बदल करणे आवश्यक आहे. परंतु कोणताही बदल न करता विषमता व द्वेष पेरणाऱ्या लिखाणातून ब्राह्मण आजही प्रेरणा घेत असतील आणि आजही विषमता व ब्राम्हणांचे एकाधिकार वर्चस्व लोक असे मान्य करतील ? फुले शाहु आंबेडकर यांनी अंधश्रद्धा, विषमता, पाखंड, मानसिक गुलामी व यामधून लोकांचे होणाचे शोषण थांबवले तर हे कोणाला नको आहे ? ज्यांना समता, बंधुता, न्याय मान्य नाही त्या लोकांना आजही विकृत का म्हणु नये. थोडक्यात असे की ब्राम्हणांना आजही विषमता, द्वेष, पाखंड, अज्ञान याचा आधार घेऊन आपले वर्चस्व कायम ठेवायचे आहे. आणि त्यांचा तो प्रयत्न ही असतो. जिवन जगताना माणुसकी व मानवता यामुळे आपले संस्कार दिसत असतात. फुले शाहु आंबेडकर यांच्या विचारावर प्रेरित होऊन फुले शाहु आंबेडकरांचे कार्य सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचवण्याचे काम प्रा. हरी नरके यांनी केले. हरी नरके धर्माने हिंदुच. फुले शाहू आंबेडकर धर्माने हिंदुच. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेवटचे दोन महिने सोडले तर बाबासाहेब हिंदुच, बाबासाहेब आंबेडकर यांची दुसरी पत्नी ब्राम्हण. फुले शाहु आंबेडकर यांच्या कार्याचा व विचाराचा प्रसार प्रसार करणारे लोक ब्राम्हण विरोधी कसे होऊ शकतात. ब्राम्हणेत्तर लोक ब्राम्हणांना का विरोध करतात याचे







उत्तर ब्राम्हण देऊ शकतील का ? प्रा. हरी नरके यांचे निधन झाले. आणि पुरोगामी चळवळीतील एक अभ्यासु व्यक्तीमत्व महाराष्ट्राने गमावले. याचे दुःख संपूर्ण वैचारिक लोकांना आहे. परंतु काही मानिसक रोगी प्रा. हरी नरके यांच्या निधनावर आनंद व्यक्त करून हास्य निर्माण करून ते किती विकृत आहेत हे दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. एखाद्या च्या मरणार हसणे हे संस्कार, संस्कृती आहे तरी कोणाची ? एकीकडे हिंदुराष्ट्राचा उदोउदो करणारे लोक प्रा हरी नरके यांच्या मरणावर आनंद व्यक्त करतात हे नेमके कोणाच्या बुद्धीला पटते ? मरणावर आनंद व्यक्त करून सोशल मिडीयावर व्यक्त होणारे सर्व लोक ब्राम्हणच कसे ? सर्वच ब्राह्मण वाईट मुळीच नसतात परंतु दुसऱ्याला ब्रम्हज्ञान सांगणारे ब्राम्हण प्रा. हरी नरके यांच्या मरणावर आनंद व्यक्त करणाऱ्यांना का आवरत नसतील ? विकृत लोकांमुळे ब्राम्हण बदनाम होत आहेत असे चांगले ब्राम्हण यांनी समोरच्या येऊन बोलणे अपेक्षित आहे. जर प्रा. हरी नरके हे धर्माने हिंदु पण केवळ वैचारिक असल्याने त्यांचा द्वेष होत असेल तर हिंदु राष्ट्रासाठी लोक वैचारिक नाही तर माणसिक गुलाम पाहिजे असाच अर्थ होतो. थोडक्यात काय तर जो व्यक्ती ब्राम्हणांचे वर्चस्व मान्य करून अंधविश्वास, पाखंड, विषमता, द्वेष यावर विश्वास ठेवून वागतो त्यालाच हिंदु म्हणायचे आणि जो माणुस समता, बंधुता, न्याय स्वातंत्र्य मान्य करून अंधविश्वास व पाखंड या बाबींना नाकारतो त्यांना हिंदु विरोधी म्हणायचे. ब्राम्हणच नाही तर ज्या काही हिंदुत्ववादी संघटना आहेत त्या पैकी कोणीही प्रा. हरी नरके यांच्या निधनावर आनंद व्यक्त करणाऱ्या व्यक्तीचा निषेध केला नाही. थोडक्यात काय तर धर्माच्या नावाखाली विकृती जपली जात आहे आणि याच विकृतींना संस्कृती म्हणायचे का प्रश्न आहे. अनेक लोक जात पाहून काही घटनेचा निषेध करतात यालाच माणुसकी म्हणायची का ? असे अनेक प्रश्न उपस्थित राहतात. प्रा. हरी नरके यांच्या निधनावर तोंड सुख घेऊन आनंद व्यक्त करणाऱ्यांना धर्मातून बाहेर काढले जाईल का ? विकृत लोकांना संरक्षण देऊन किंवा त्यांच्या विरोधात एकही शब्द न बोलून विकृतीवर पडदा टाकला जाऊ शकतो परंतु विकृती कमी होत नाही. स्वतः ला धर्माचे व संस्काराचे ठेकेदार समजणाऱ्या लोकांनी तर विकृतीचा निषेध करून आपली संस्कृती विकृती पसरवण्याची नाही हे सिद्ध करून द्यावे. धर्माच्या नावावर राजकारण करून आम्ही हा फुले शाहु आंबेडकर यांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे. असे बोलणारे लोक फुले शाहु आंबेडकर यांच्या वैचारिक वारसाची मरणानंतर ही निंदा केली जात असेल, दुःखाचा दिवस आनंद म्हणून साजरा केला जात असेल तर अशा लोकांवर कारवाई करणार का ? आज कोणत्याही व्यक्तीकडून ही अपेक्षा मुळीच नाही की तो आपल्याच जाती धर्माच्या माणसावर कारवाई करेल. परंतु माणुसकी आणि नैतिक जबाबदारी म्हणून तरी कारवाई होईल का हा संशोधनाचा विषय आहे. महापुरुषांच्या विचाराचे विडंबन येथे नेहमीच होत आहे. त्याला खतपाणी कोणाकडून दिले जाते हे सर्वसामान्य जनतेला चांगले च माहिती आहे. परंतु या मध्ये सर्वच दोष विकृती पसरवणाऱ्यांनाच देऊन फायदा नाही. कारण पुरोगामी विचारसरणीला दाबण्याचा प्रयत्न येथे होत असताना लोकांनी काही नेत्यांना विचारधारेचे समजून विश्वास ठेवला. परंतु खुर्चीची लालसेपोटी विचारांना गहाण ठेवून लाचार झालेले लोक फुलेंचा अवमान झाला तरी काही बोलु शकले नाहीत. प्रा. हरी नरके यांच्या मरणावर आनंद व्यक्त करणाऱ्याच्या विरोधात ते बोलु शकत नाही कारण ते खुर्चीत जरी बसले असतील तरी त्यांच्या गळा मात्र दाबलेला आहे. म्हणून महात्मा फुलेंच्या विचाराचा वारस स्वतः ला समजणारे महात्मा फुले व त्यांच्या वारसावर होणाऱ्या निंदेचा साधा निषेदही करू शकत नाही. एवढी गंभीर घटना होऊन ते खुर्चीही सोडू शकत नाहीत हा पण विकृतीचाच भाग आहे. म्हणजे विकृती विकृती मिळून एकत्र आले तर त्याला संस्कृती म्हणायचे का ? हा प्रश्न सर्व सामान्य लोकांच्या मनात निर्माण झाला आहे. धर्माच्या नावाखाली बलात्काऱ्यांना बापु आणि देशद्रोह्यांना जर गुरुजी संबोधले जात असेल तर संस्कृती चा खुण होणारच. परंतु संस्कृती चा खुण करून विकृती ह्या कधीच संस्कृती बनत नसतात. आजच्या या माहिती तंत्रज्ञान व संविधानाच्या काळात वैचारीक लोकांना अशाप्रकारे वागवले जाते तर जेव्हा माहिती तंत्रज्ञान नव्हते, लोकांना शिक्षण व हक्क अधिकार नव्हते तेव्हा एखाद्या व्यक्ती वैचारिक पद्धतीने वागून थोतांड व विषमता नाकारत असेल तर त्याला विकृत लोकांनी किती त्रास दिला असेल याची कल्पना ही करता येणार नाही. आज चांगले ब्राम्हण समोर येऊन वाईट ब्राम्हणांना चुकीचे कृत्य करू नका असे सांगत नाहीत तेव्हा प्रश्न येतो चांगले करा ते इतरांना कसे सांगु शकतात. ब्राह्मण व ब्राम्हणेत्तर हा संघर्ष वैयक्तिक पातळीवर मुळीच नाही तो वैचारिक पातळीवर आहे. जर माणसाने माणसासोबत माणसासारखे राहले, समता बंधुता न्याय या तत्वावर विश्वास ठेवून राहले आणि अंधविश्वासाच्या नावाखाली लोकांचे माणसिक व आर्थिक शोषण थांबले तर ब्राह्मण आणि ब्राम्हणेत्तर हा संघर्षच थांबणार आहे. एवढे सरळ सोपे असुनही ब्राम्हण आणि ब्राम्हणेत्तर संघर्ष थांबत नाही कारण ब्राह्मण आपले श्रेष्ठत्व सोडून स्वतः ला सर्वसामान्य माणुस मानायला तयार नाही. अंधविश्वास दुर करायला तयार नाही कारण अंधविश्वासावरच अनेक पुरोहितांचे उदरनिर्वाह सुरू आहेत. आणि पुर्वी पाहून ब्राम्हण आणि ब्राम्हणेत्तर यांचा संघर्ष याच साठी झाला आहे तो म्हणजे पुरोहीतांनी देव व माणुस यामधील मध्यस्थी थांबवावी, ब्राम्हण ही एक माणुसच आहे त्यांनी समता बंधुता व न्यायाने वागावे. परंतु हेच काही लोकांना मान्य नाही म्हणून आजही संघर्ष सुरुच आहे. कोणत्याही संघर्ष हा वैचारीक असेल तर काही करकत नसते परंतु वैयक्तिक संघर्ष हा माणुसकीला काळीमा फासणारा असतो. ब्राम्हण देवाचे दुत आहेत अस माणले जाते देवाच्या दुतांनी मोठेपणा दाखवून समता, बंधुता न्याय यावर विश्वास ठेऊन अंधविश्वास विरोधात काम करणाऱ्यांना समर्थन व स्वतः ही अंधविश्वास याला विरोध करून सामाजिक शांतता प्रस्थापित केली तर देशात अराजकता माजणार नाही. परंतु आजही लोकांना फुले शाहु आंबेडकर यांच्या विचाराची व कार्याची धास्ती आहे. कारण हिच विचारधारा विषमता, अंधविश्वास व अन्याय मुळासकट उपटून काढू शकते. आणि काही लोकांना आजही विषमता, अंधविश्वास कायम ठेवून स्वतः चे वर्चस्व कायम ठेवायचे आहे. म्हणून ते आपल्या डोक्यातील विकृती बाहेर काढून फुले शाहु आंबेडकर यांच्या विचारांचा विरोध करतात. प्रा हरी नरके यांनी याच विचाराचा प्रचार आणि प्रसार केल्याने काही लोक त्यांना हिंदुही समजत नाहीत. तर केवळ पुरोगामी समजतात. यावरून पुरोगामी लोक, वैचारिक लोक हिंदु नसतात. हिंदु होण्यासाठी माणसिक गुलामी आवश्यक असते. जेने करून विकृत गोष्टी समाजामध्ये पेरून त्याला संस्कृत करण्याचा प्रयत्न येथे सुरू आहे. केवळ फुले शाहू आंबेडकरांच्या विचाराचा प्रसार आणि प्रचार केल्या मुळे प्रा. हरी नरके यांच्या निधनावर हसणाऱ्या विकृतीचा निषेध. संस्कृती लोकांनी विकृत लोकांना आवर घालावा तरच कायदा व सुव्यवस्था निर्माण होईल.

# डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जींनी ब्रिटिशांना पत्र दिलेच नाही



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577


आधुनिक केसरी

**शिल्लक शिवसेनेचे मुख्य प्रवक्ते खा.संजय राऊत खोटं बोलण्यात आणि असत्य पण सत्य असल्याचा आव आणत पटवुन देण्यात वस्ताद म्हणून राजकिय क्षेत्रात ओळखले जावु लागले आहेत. प्रसिद्धीच्या नादात तोंडाला येईल ते बोलणं, बेछुट आरोप करणं आणि द्वेषाची भाषा करत राजकिय संस्कृतीच ज्या माणसानं बिघडुन टाकली त्या राऊतांनी परवा दिल्लीत बसुन पुर्व इतिहासाचा धातांड दाखला देत डॉ.शामाप्रसाद मुखर्जींनांच मरणोत्तर वेदना होतील असं वक्तव्य केलं. ब्रिटिशांना म्हणे मुखर्जीनं त्या काळात चलो जाव आंदोलन चिरडुन टाकण्याचे पत्र दिलं. त्याचा कुठलाही पुरावा राऊताकडे नाही. असं पत्र मुखर्जीनं कधीच दिलेलं नाही.**

एव्हाना त्या काळात ब्रिटिशाच्या तुरूंगात देखील काही काळ मुखर्जी होते. असं असताना विरोधकांना केवळ बदनाम करण्यासाठी त्यांच्या पुर्वसुत्राची नावं घ्यायची, खोटे दाखले देवुन बदनामी करायची हा मुळ धंदा राऊतांचा आहे. वास्तविक पहाता त्यांच्या एकाही शब्दावर राज्यातील जनतेचा विश्वास नाही तो भाग वेगळा. पण आपण राजकारणात वेगळे कसे आहोत ?हे दाखवण्यासाठी तोंडाळपणा सुरू असंच म्हणावे लागेल.

राजकारणात सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आरोप करायचा झाला तर अलीकडे त्याची सत्यता न पहाता खोटे बोलायचं ज्याचा कुठलाही पुरावा नसतो. पण केवळ सनसनाटी निर्माण करायची आणि आपण काहीतरी वेगळंच करू शकतो या आविर्भावात बोलुन जायचं. हा धंदा शिल्लक शिवसेनेचे मुख्य प्रवक्ते संजय राऊतांनी पत्करलेला दिसुन येतो. 9 ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने भाजपाने स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या शहिदांच्या स्मृतीसाठी म्हणून देशभरात वेगवेगळे राष्ट्रभक्तीचे कार्यक्रम हाती घेतले. त्यावर टिका करताना भाजप तथा संघ परिवाराचा स्वातंत्र्य पुर्व चळवळीत कुठलाही सहभाग नसल्याचे जाहिरपणे राऊत म्हणाले. एवढ्यावर थांबणार ते राऊत कुठले ? त्यांनी चक्क ब्रिटिशांना तत्कालीन काळात डॉ.शामाप्रसाद मुखर्जींनी चले जाव आंदोलन चिरडुन टाका अशा प्रकारचे पत्र दिल्याचे राऊतांनी भीमदेवी थाटात सांगितले. खरं तर लोकांची केवळ दिशाभुल करण्यासाठी म्हणून विरोधक जेव्हा खोटेपणाचा आव आणतात त्यावेळी सामान्य माणसाला मात्र त्या गोष्टी मुळात पटत नाहीत.

संघ परिवार स्वातंत्र्य चळवळीचा भाग तत्कालीन काळात होता हे त्रिकालाबाधीत सत्य आहेच पण तत्कालीन काळात हिंदुत्ववाद्यांची राष्ट्रभक्ती विशेषतः काँग्रेसीवाल्यांनी लोकांच्या पुढे येवु दिली नाही. पण स्वातंत्र्यासाठी चळवळ जेव्हा सुरू होती त्या काळात संघ संस्थापक कै.हेडगेवार 1925 च्या अगोदर हेच मुळात काँग्रेसमध्ये होते. साहजिकच त्या चळवळीचा भाग होते. तदनंतर काँग्रेस विचारासोबत मतभेद झाले. त्यातुन त्यांनी हिंदु एकजुट व्हावी म्हणून संघाची स्थापना केली. एक गोष्ट निश्चित आहे संघ परिवारातील कार्यकर्ता हा खऱ्या अर्थाने संजय राऊतांच्या पत्राचाळीसारखा लुटारू नसतो हे त्रिकालाबाधित सत्य. त्या राऊतांनी पत्राचाळीत मराठी सुशिक्षित बेरोजगारांना देशोधडीला पाठवलं आणि केवळ मलिदा लाटण्यासाठी गैरव्यवहार केला. पण आपल्यावर भ्रष्टाचाराचे जेव्हा डाग असतात अशी माणसं छाती काढून दुसऱ्याकडे बोट दाखवतात तो निसर्गाचा नियमच आहे. संजय राऊत हा माणुस किती खोटे बोलतो ? तेही जगाच्या समोर. हे काल उघडं पडलं. शामाप्रसाद मुखर्जीनं ब्रिटिशांना चले जाव आंदोलन चिरडुन टाकण्यासाठी पत्र दिल्याचे त्यांनी सांगितले. गंमत बघा, एक तर मुखर्जी स्वातंत्र्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रीमंडळात कॅबीनेट मंत्री म्हणून होते. जर मग अशा प्रकारचे पत्र ब्रिटिशांना दिलं असतं तर नेहरूंनी मंत्रीमंडळात त्यांना घेतलं असतं का ? अर्थात मंत्रीमंडळात त्यांनी काश्मिरमधील 370 कलम लावु नये अशी भुमिका त्यांनी घेतली होती. सोबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. त्या मुद्यावरून मंत्री पदाचा राजीनामा मुखर्जीनं दिला होता. खरं तर इतिहास माहिती नसेल तर मागची पाने चाळत वाचन करायला हवा. पण प्रकांड पंडित



आपणच आहोत आणि आपल्यापेक्षा इतर कुणाची ज्ञान मोठं नाही हा ज्यांच्या अंगी अहंकार असतो, जे स्वतःला पत्र पंडित समजतात अशांचा खोटारडेपणा उघडा पडल्याशिवाय रहात नाही. खरं तर त्या काळात मुखर्जींना ब्रिटिशांनी जेलमध्ये टाकले होतं असे बरेचजण सांगतात. मग त्यांना पत्र देण्याचा संबंध येतो कसा ? दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे तत्कालीन काळात ज्या काही राष्ट्रभक्तीच्या चळवळी झाल्या त्यात कुणी कुणाला पत्र दिले याचे पुरावे आजही सापडतात पण ब्रिटिशांना अशा प्रकारचे पत्र मुखर्जीनं दिलं हा पुरावा कुठेही नाही. पण बिनडोकपणाची भाषा बोलायची आणि छाती बदडुन घ्यायची हा मुळ स्वभाव राऊतांचा म्हणावा लागेल. खरं तर त्यांनी तशा प्रकारचे पत्र हा पुरावा माध्यमांच्या समोर द्यायला हवा. भाजपाचे प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी तर असं पत्र तुम्ही द्या, आम्ही प्रवक्ते पदाचा राजीनामा देतो आणि पत्र नसेल तर तुम्ही खासदारकीचा राजीनामा द्या असे खुले आवाहन त्यांना दिले होते. पण ज्यांच्या डोक्यात केवळ प्रसिद्धीच्या लाटा उसळलेल्या असतात अशी माणसं ज्यांच्यातला अहंकार रावणापेक्षा आजच्या काळात जास्तच म्हणावा लागेल. स्वातंत्र्यपुर्व काळात तत्कालीन व्यवस्थेत देशाला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी जणु काही आम्हीच सारं काही केलं या भुमिकेतुन अजुनही काँग्रेस बाहेर पडलेली नाही. महात्मा गांधी यांनी दिलेला लढा सर्व समावेशक आणि देशातील सर्वांना सोबत घेवुनच होता. त्या लढ्याचे पाईक संघ परिवाराचे तत्कालीन काळात अनेक कार्यकर्ते आहेत. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या काँग्रेसवाल्यांनी भाजपवाल्यांच्या योगदानाचा विसर लोकांना पडावा म्हणून त्याची चर्चा माध्यमातून लोकांच्या पुढे येवु दिलेली नाही हे तितकंच महत्वाचं. पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांनी 1940दरम्यान म्हणजे स्वातंत्र्य मिळण्याच्या अगोदर अंत्योदय अर्थात शेवटच्या माणसासाठी काम केलं पाहिजे हा विचार मांडला. पण त्यांनी दाखवुन दिलेला मार्ग काँग्रेसवाल्यांनी कधीच लोकांच्या पुढे येवु दिला नाही. देशात व्यवस्था बदल झाली. मोदी नेतृत्वाचा उदय झाला. त्यावेळी मात्र डॉ.शामाप्रसाद मुखर्जी असतील किंवा पंडीत दीनदयाळ उपाध्याय असतील यांच्या विचाराची देशात सर्वदुर चर्चा होवु लागली. राष्ट्रभक्त फक्त काँग्रेसकडेच असा एक गैरसमज त्यांच्या अनुयायांचा होवुन बसलेला आहे पण काश्मिरमध्ये 370 कलम लावु नका ही मागणी करत डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांनी दिल्ली ते काश्मिर असा प्रवास केला. तिथे जावुन चळवळ उभा केली. या मागणीसाठी लढा देताना त्यांचा बळी गेला. म्हणूनच नंतरच्या काळात 370 कलमाची लढाई भाजप जेव्हा लढायचं तेव्हा मुखर्जींचं बलिदान व्यर्थ जावु नये त्यासाठी वर्षानुवर्षे संघर्ष केला. अर्थात एक दिवस नियतीला मान्य होता तो आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2014 नंतर देशाची सुत्रे हाती घेतली. मग काश्मिरमधील 370 कलम हटवुन दाखवलं. खरं तर शामाप्रसाद मुखर्जी यांचं स्वप्न साकार करण्यासाठी अनेक वर्षे लागली. पण भाजपाने अखेर ते करूनच दाखवलं. या साऱ्या गोष्टी बिचाऱ्या संजय राऊतांना माहिती कसं असणार ? कारण केवळ द्वेषाचं राजकारण करायचं आणि विरोधकांवर चिखलफेक करत रोज बदनामी कशी होईल ? एवढाच हिशोब डोक्यात ठेवायचा. ना कुणाचा इतिहास वाचायचा ना चाळुन पहायचा. तोंडाला येईल ते तोंड चोपडेपणा करत केवळ मालकाला खुष करण्यासाठी चाकरी करायची एवढंच राऊतांना माहितीय. त्यापेक्षा सकारात्मक पाहण्याची दृष्टी देखील त्यांच्याकडे नाही.

# क्रांतिकारक खुदीराम बोस



माधव बैलकवाड
संपर्क 9545013082

आधुनिक केसरी

**खुदीराम बोस भारतातील सर्वात तरूण वयाचा क्रांतीकारक म्हणून ओळखला जाणारा हा वीर वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी हुतात्मा झाला. त्याचा जन्म बंगाल मधल्या मेदिनीपूर जिल्ह्यातल्या बहुवेनी या गावात दि. ३ डिसेंबर १८८९ ला झाला. त्याच्या लहानपणीच आई (लक्ष्मीप्रियादेवी) आणि वडील (त्रैलोक्यनाथ) यांचा मृत्यु झाल्याने त्याची मोठी बहीण अनुरूपादेवी आणि तिचे पती अमृतलाल यांनी पालनपोषण केले.बंगाल प्रांताचे विभाजन करण्याचे ब्रिटीश सरकारने १९०३ साली निश्चीत केले. सर्वसामान्य लोकांमध्ये नाराजीची तीव्र लाट पसरली.**

खुदीरामलाही बंगालच्या फाळणीचा निर्णय अन्यायकारक वाटला, देशासाठी काहीतरी करावे असे सारखे वाटू लागल्याने मिदनापूर येथे थोडेफार शिक्षण झाल्यावर त्याने सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करला. सरकारच्या विरूद्ध आंदोलने करणाऱ्यांना पकडून कठोर शिक्षा देण्यात येऊ लागल्या. थोडयाच दिवसांत मुझफ्फरपूरचे मॅजिस्ट्रेट जे क्रांतिकारकांना अमानुष शिक्षा देत, त्यांना मारण्याची जबाबदारी क्रांतिकारकांचे नेते बरींद्रकुमार व उपेंद्रनाथ यांनी खुदीरामवर सोपवली व मदतनीस म्हणून प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती याला मदतीला दिले. ते दोघेही मुझफरपूरमध्ये आले व मॅजिस्ट्रेट किंग्जफ़ोर्ड याच्यावर लक्ष ठेवून संधीची वाट पाहू लागले. न्यायाधीश किंग्ज फोर्डला मारूनच सरकारचा विरोध करण्याचे त्यांनी पक्के केले. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या आनंदमठ या कादंबरीतील "वंदे मातरम" या गीताने त्यांनी लोकांमध्ये नव संजीवनी पसरविली.

खुदीरामने किंग्ज फोर्ड ला मारण्याची जबाबदारी स्वीकारली. त्याचा सहकारी प्रफुल्ल चक्रवर्ती याच्या सहकाऱ्याने दि. ३० एप्रील १९०५ या दिवशी किंग्ज फोर्ड याच्या गाडीवर बाँब फेकून त्याला मारण्याचे निश्चीत झाले. त्याप्रमाणे एक बाँब फेकण्यात आला. परंतु तो चुकून दुसऱ्याच



एका गाडीवर फेकण्यात आल्याने त्या गाडीतील दोन महिला ठार झाल्या, किंग्ज फोर्ड मात्र बचावला. खुदीराम व त्याचा साथीदार यांनी तत्काळ पळ काढला. खुदीराम रातोरात चाळीस किलोमिटर पळाला व बेनी रेल्वे स्टेशवर आला. भूक लागल्यामुळे तो एका दुकानात चणेफुटाणे घेत असताना तेथील स्टेशनमास्तर पोंटरला म्हणत होता, 'अरे ही बातमी वाचली का ?' काल मुझफपुरला दोन मडमांचा खुन करुन दोघे जण फरारी झाले आहे. त्यांना पकडण्यासाठी वॉरंट सुटले आहे. तेव्हा आता ही गाडी येईल त्यात कोणी सापडते का पाहा. खुदीरामने हे भाषण ऐकताच, तो एकदम म्हणाला, "काय, किंग्जफ़ोर्ड मेला नाही." जवळच्या लोकांना त्याच्या या उदगाराचे आश्चर्य वाटले व त्यांना शंका आली. त्याबरोबर खुदीरामने तेथून पळ काढला. घटनेच्या दुसऱ्या दिवशी खुदीराम पकडला गेला, तर प्रफुल्लने अटकेपूर्वीच आत्महत्या केली. खुदीरामजवळ दोन पिस्तुले व ३० काडतुसे सापडली. त्याच्यावर ३०२ कलमाखाली खटला भरुन त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. ११ ऑगस्ट १९०८ रोजी हा तरुण वीर हातामध्ये गीता घेऊन व भारतमाता की जय म्हणत हसत हसत आनंदाने फाशी गेला. सशस्त्र क्रांतीत बाँबचा उपयोग करणारा खुदीराम पहिला क्रांतीकारक ठरला.



# आजादी का अमृत महोत्सव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील हुतात्मा स्मारकामध्ये तहसील कार्यालय जिंतूर व ग्रामपंचायत कार्यालय चारठाणा यांच्या संयुक्त विद्यमानाने दि.११ शुक्रवार रोजी सकाळी९:३० वाजता आजादी का अमृत महोत्सव निमित्त येथील परिसरातील विर स्वातंत्र्य सैनिकाच्या वारसाच्या मानसन्मान सत्कार व येथील परिसराची स्वच्छता अभियान रांगोळी, वृक्षारोपणासह आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच अनिरुद्ध चव्हाण, प्रमुख पाहुणे जिंतूर महसूल विभाग तहसीलदार राजेश सरवदे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी गायकवाड पोलीस उपनिरीक्षक विनोद साने, स्वतंत्र सैनिकाचे वारस विलास जोशी, लक्ष्मीकांत सोनवटकर ,संदीप चौधरी,नायब तहसीलदार प्रशांत राखे, अजगर देशमुख, इंद्रजीत घाटूळ उपसरपंच वाजेद कुरेशी, सय्यद मुस्ताक अहमद, तलाठी आर.एन.गायकवाड, धनश्याम सोनवणे,अनिल राठोड,मोसीन पठाण,राहुल धुळे,चारठाणा मंडळ अधिकारी आत्मराम जाधव,गिता बावणे,आरती शेळके, यांच्यासह सर्व तलाठी व मंडळ अधिकारीची उपस्थित होते.

येथील हुतात्मा स्मारकातील हुतात्म्यांना विनम्र अभिवादन करून स्वतंत्र सैनिकाचे वारस विलास गोविंदराव जोशी, लक्ष्मीकांत नारायणराव सोनवटकर व संदीप चौधरी यांना शाल, श्रीफळ,पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला, याप्रसंगी बिट जमादार यु.टी.सातपुते,दत्तराव भदर्गे,एस.एस.वासलवार,हनुमान पावडे,रविराज वानरे, जि.प.मा.शाळेचे मुख्याध्यापक डि,यु. राठोड, रत्नाकर जोशी,सिद्धार्थआचार्य, मधुकर भवाळे अथर काजी गुरुलिंगआप्पा राऊत, सलाम इनामदार ,सय्यद खलील, गणेश पारवे ,भारत खाडे, सिराज इनामदार,दत्ता कांबळे, किरण देशमुख,मुकुंद मुंजे,

महादेव गीते, एकनाथ आवचार यांच्यासह आदीची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आर.आर. जोशी यांनी केले यावेळी या कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी व गावातील ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# डॉ. आंबेडकरांच्या ३५० फूट उंचीच्या पुतळयास मान्यता

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दादर येथील इंदू मिलच्या जागेवरील आंतरराष्ट्रीय स्मारकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ३५० फूट उंचीचा पुतळा उभारण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. विख्यात शिल्पकार राम सुतार यांनी त्यांच्या गाझियाबाद येथील शिल्पशाळेत डॉ. आंबेडकर यांच्या २५ फूट उंचीच्या पुतळयाची प्रतिकृती तयार केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत १६ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवारातील सदस्य, लोकप्रतिनिधी तसेच आंबेडकरी चळवळीतील मान्यवर व्यक्ती यांना सोबत घेऊन गझियाबाद येथील शिल्पशाळेतील आंबेडकरांच्या पुतळयाची प्रतिकृती प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्याचे ठरले होते. त्यानुसार ६ एप्रिल रोजी प्रतिकृतीची पाहणी करून, त्यास संमती देण्यात आली.

राज्य शासनाने आता गझियाबाद शिल्पशाळेतील २५ फुटी प्रतिकृतीच्या धर्तीवर इंदू मिलच्या जागेवरील स्मारकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ३५० फूट उंचीचा पुतळा बसविण्यास मान्यता दिली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने गुरुवारी त्यासंबंधीचा शासन आदेश काढला आहे.

# शासनाच्या राष्ट्रीय एकता पुरस्काराने होणार IIB चे संचालक प्रा. चिराग सेनमा यांचा गौरव

## उद्या दिल्ली येथे होणार पुरस्कार वितरण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज


**लातूर :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त दिल्ली सरकारच्या ओबीसी आयोग आयोगामार्फत विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा गौरव केला जाणार आहे. यामध्ये लातूर शहरात येथे विविध नाविन्यपूर्ण आणि कौतुकास्पद उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीला चालना देत नवीन शैक्षणिक क्रांती घडवून आणणाऱ्या आयआयबी इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर प्रा. चिराग सेनमा यांना "राष्ट्रीय एकता पुरस्काराने" गौरविण्यात येणार आहे. कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया, रफी मार्ग, नवी दिल्ली येथे 13 ऑगस्ट रोजी सायंकाळी 4 वाजता हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे.
लातूरला शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. त्याचबरोबर लातूर पॅटर्न म्हणून लातूरचा सर्वत्र नावलौकिक आहे. दरम्यान, मागील काही वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी नाविन्यपूर्ण आणणे आणि त्या यशस्वीपणे राबवून लातुरात शैक्षणिक दर्जा उंचावन्याचे काम आयआयबी इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर प्रा. चिराग सेनमा यांनी अगदी चपखलपणे केले


Invitation

To,
Mr.Chirag. S. Senma
In honour of the 75th anniversary of the Indian Independence, the OBC Commission, Government of National Capital Territory of Delhi is organising a felicitation Ceremony and Award function for the people who have done remarkable work in the society on 13th August at 4pm at Constitution Club of India, Rafi Marg, New Delhi.
You are being awarded for your remarkable work in the field of Education.
Kindly accept the invitation and be present on time to receive the award.

Regards
Jagdish Yadav
Chairman
OBC Commission,
Government of NCT of Delhi

आहे. प्रा. चिराग सरांची अत्यंत दर्जेदार अशी टिचिंग पद्धती, अकॅडमीक प्लॅनिंग आणि विद्यार्थ्यांवर त्यांच्या अध्यापनाचा असलेला प्रभाव यामुळे विद्यार्थीप्रिय




शिक्षक म्हणून प्रा. चिराग सरांना ओळखले जाते. सरांनी जनता दरबारची संकल्पना आणि त्याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी त्यांच्या क्षमतेनुसार

> शासनाचा हा पहिलाच पुरस्कार मिळाला असून
>
> 
>
> माझ्यासाठी हा खूप आनंदाचा क्षण आहे . मी जे काही नवनवीन करायचा प्रयत्न केला त्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार मिळाल्याचा अभिमान तर आहेच पण या पुरस्काराने जबाबदारीही वाढली आहे . आगामी काळात लातूरला नवीन शैक्षणिक ओळख निर्माण करून देण्याचा माझा प्रयत्न असेल . हा पुरस्कार मिळाला आहे त्यामध्ये सोबत कार्य करणाऱ्या सर्व टीम आयआयबीचेही मोलाचे सहकार्य लाभले . त्यामुळे सर्वांचे खूप-खूप आभार .
>
> **- प्रा . चिराग सेनमा, डायरेक्टर आयआयबी इन्स्टिट्यूट**

राबविण्यात आलेल्या विविध योजना आणि उपक्रम राबविले. यामध्ये केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अध्यापनाचा नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीचे मूळ रुजविणे यालाही प्राधान्य दिले. क्लासेस कॅम्पस किंवा वर्गामध्ये स्मार्ट व्हॉच आणि मोबाईल वापरावर निर्बंध ही संकल्पना पहिल्यांदाच लातुरात राबविली. कोरोना संकटानंतर जवळपास 90 टक्के विद्यार्थ्यांकडे स्मार्ट फोन होता आता आयबीबी इन्स्टिट्यूटच्या नियमांनंतर सध्या विद्यार्थ्यांमध्ये स्मार्ट फोन वापरण्याचे प्रमाण लक्षणीय प्रमाणात कमी झाले असून विद्यार्थ्यांचा मोबाईल वापरावर जाणारा वेळ हा अभ्यासाकडे वळला आणि त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता झपाट्याने वाढली असल्याचे दिसते. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच प्रा. चिराग सर आपली सामाजिक बांधिलकी विविध प्रकारे बजावत असतात. यामध्ये सर्वात कौतुकास्पद उपक्रम म्हणजे लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील हसेगाव येथे एचआयव्ही-एड्स बाधित मुलां-मुलींसाठी कार्य करणाऱ्या सेवालय या संस्थेतील सर्व मुलां-मुलींचे शैक्षणिक पालकत्व स्वतः प्रा. चिराग सेनमा यांनी स्वीकारले असून या विद्यार्थ्यांनी भविष्यात दैदिप्यमान यश संपादन करावे असे सरांचे स्वप्न आहे. प्रा. चिराग सरांच्या या सर्वांगीण गुणांचे आणि त्यांच्यातील एका सृजनशील व्यक्तिमत्त्वाचा गौरव व्हावा आणि त्यांच्या या कार्याचा इतरांनीही आदर्श घ्यावा या हेतूने दिल्ली सरकारच्या ओबीसी आयोग आयोगामार्फत प्रा. चिराग सेनमा यांना "राष्ट्रीय एकता पुरस्काराने" गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रा. चिराग सरांचे विद्यार्थी वर्ग, पालक, शिक्षण क्षेत्रासह सर्वस्तरातून अभिनंदन केले जात आहे.



# अठ्ठावीस वर्षांनंतर एकत्र आले वर्गमित्र

आधुनिक केसरी न्यूज

**बाजारसावंगी :** येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या १९९५ वर्षाच्या दहावीच्या वर्गमित्रांचे रविवारी मित्र दिनानिमित्त म्हैसमाळ येथे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी सर्वांनी जुन्या आठवणीना उजाळा दिला. दहावीनंतर हे वर्गमित्र शिक्षण व नंतर नोकरी व्यवसायानिमित्त इतरत्र पांगले, सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आल्यानंतर स्नेहमेळाव्याची संकल्पना त्यांना सुचली. त्यानुसार रविवारी म्हैसमाळ येथे तब्बल २८ वर्षांनंतर त्यांचा मेळावा भरला. यात साठ वर्गमित्र एकत्र आले होते. सर्वप्रथम निधन झालेल्या वर्ग मित्र व शिक्षकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अनेक वर्षांनी एकमेकांना प्रत्यक्ष पाहिल्यानंतर सर्वांना आनंदाचे उधाण आले होते. यावेळी प्रत्येकाने जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच भविष्यातही एकमेकांच्या संपर्कात राहण्याचे ठरवून सर्वांनी निरोप घेतला. या कार्यक्रमासाठी केशवराव जाधव, देविदास धोंडकर, मनोहर धोंडकर, देविदास काटकर, अविनाश पवार, गणेश काटकर इतरांनी परिश्रम घेतले.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयात वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज



**घोडेगाव :** दि.09 ऑगस्ट रोजी राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय, राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय आणि सद्गुरु जनेश्वर माध्यमिक विद्यालय घोडेगाव येथे साईसेवा बहुविध प्रतिष्ठान व साकला लॅन्डस्कॅपींग यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय येथे भव्य वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन माननीय साईनाथ पाटील जाधव साहेब हे होते तर, प्रमुख अतिथी म्हणून माननीय डॉ. सतीश सुराणा साहेब( प्राचार्य,वी के कॉलेज ऑफ सोशल वर्क, औरंगाबाद ),माननीय श्री. सुरेश साकला सर, ( साकला नर्सरी ) माननीय मारुती फुलारी सर, माननीय नितीन चिचानी सर, ( प्रेसिडेंट, लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद ), जीएम बोथरा सर रजदीप सिंग चावला सर , विजय सरकटे सर, अभय निकाळजे ( वरिष्ठ पत्रकार ) शर्मा साहेब, एन.के.सर्जे सर हे उपस्थित होते. यानंतर व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. सत्कार समारंभ- प्रमुख अतिथीचे स्वागत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष साईनाथ पाटील जाधव साहेब यांनी केले. तर साईनाथ पाटील साहेबांचे स्वागत प्राचार्य डॉ.डी. डी. घुगेसर व मुख्याध्यापक खैरनार सर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे अध्यक्ष साईनाथ पाटील जाधव साहेब यांनी केले.

यानंतर प्रमुख अतिथी साकला सर यांनी विविध ठिकाणी साकला लॅन्डस्कॅपींग तर्फे करण्यात आलेल्या वृक्षारोपण, त्यानंतर वृक्षाची काळजी घेणे. यावर मार्गदर्शन केले. सतिश सुराणा सर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले. झाडे लावा व झाडे जगवा, पर्यावरणाचे संतुलन टिकवणे. अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले.यानंतर जीएम बोथरा सर, नितीन चिचानी सर व एन के. सर्जे सर यांचे भाषण झाले. नंतर विख्यात साहित्यकार ना. धो. महानोर, साहित्यिक व विचारवंत हरी नरके सर, प्राचार्य बोराडे सर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता 11वीची विद्यार्थीनी कु.वैष्णवी जाधव हिने केले . तर आभार प्राचार्य डी डी घुगेसर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. यानंतर मान्यवरांनी , विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण रोपण केले.विविध देशी झाडे लावण्यात आली. यासाठी लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद ची खुप साथ लाभली. यावेळी शाळा,वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



# आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**पनवेल :** ऑल इंडिया अँटी करप्शन पार्लमेंट कमिटी संस्थेच्या पुढाकारातून दुर्गम भागातील आदिवासी बहुल शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय वस्तूचे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. सदर उपक्रम संस्थापक अध्यक्ष डॉ. अविनाश सकुंडे,राष्ट्रीय कार्याध्यक्ष जितेंद्र सकपाळ यांच्या सूचनेनुसार व महाराष्ट्र राज्य सचिव दिगंबर हरी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मु.हरिग्राम पो.मोरबे ता. पनवेल येथे आदिवासी पाडा या भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. यावेळी ऑल इंडिया अँटी करप्शन पार्लमेंट कमिटी रायगड जिल्हा सचिव करण कांबळे, उपसचिव राकेश शिरावळे,आनंद ठोंबरे,अपर्णा पाटील,सिद्धी पाटील,आराध्य पाटील व स्थानिक उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# गोसेवकाने केले गायीवर उपचार

आधुनिक केसरी न्यूज



**चारठाणा :** जिंतूरमध्ये रस्त्यावरील फिरस्ती गायी जास्त प्रमाणात आहेत. त्या गायीला शिळे अन्न, पोळ्या खाऊ घालने खूप घातक ठरू शकते, ही गाय काल पासून अस्वस्थ असल्यामुळे तिला उठता येत नव्हते, ती कोणाची आहे माहीत नाही, तिचा उपचार गोसेवेच्या भावनेने डॉक्टर खंदारे यांनी केला. त्या वेळी पवन कुलथे, बालाजी सोमाणी , डीगा सिद्धनाथ,यांनी डॉक्टर आणून उपचार केले. त्यांना मदत कुणाल कोकडवार, राजू देशमुख, अरविंद सावजी, अतुल कोकडवार यांनी गायला औषध उपचार करून घेतला आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चौक येथील 4 दिवस आगोदर एक गाय पलसिद्ध कॉम्प्लेक्स समोर मोठ्या नाल्यात पडली ती गाय 3 तास त्यानाल्यात होती. अखेर मारोती घुगे यांनी पत्रकार सचिन रायपत्रीवार यांना फोन केला त्यांनी दुकानातील मनोहर पायघण, विनोद पिंगळे, गणेशभाऊ, परमेश्वर मोहिते, कॉम्प्लेक्स मधील दुकानदार व सर्व मित्राच्या साह्याने गाय बाहेर काढली. जर आपल्या गायी आपण व्यवस्थित सांभाळेतर अशी वेळ येणार नाही. गोसेवक असे सांगतात. हिंदू समाजातील गोमाता समजले जाते तेव्हा नागरिकांनी गाईचे खाद्य हिरवा चारा, कडबा, पेंड हा असतो , तो दिला तर खूप चांगले, तरीही उरलेल्या पोळ्या द्यायच्या झाल्या तर त्यांना प्रमाणातच द्याव्यात, तसेच नासलेले, खराब झालेले, वास येत असलेले अन्न गाईंना देऊ नये, त्यामुळे अपचनचा त्रास गाईंना होत असतो, तसेच अन्न के कॅरीबॅग मध्ये टाकू नये, कारण गाय ते अन्न त्या प्लास्टिक सह खाऊ शकते, आणि ते पचने शक्य नसल्याने गाय बिमार पडेल, त्यामुळे योग्य ती खबरदारी सर्वांनी घ्यावी, व ज्याची गाय आहे त्यांनी घेऊन जावी, अशी विनंती गोसेवक अतुल कोकडवार यांनी केली होती नंतर गायचे मालक रमेशकाका देशपांडे यांच्या स्वाधीन केली.



# नवीन पेन्शन योजना बंद करून जुनी पेन्शन योजना चालू करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू होण्यासाठी देशव्यापी लढ्याची मागणी सर्व राज्यांत अधिकाधिक बळकट होत आहे. महाराष्ट्रा मध्ये संप काळात दि. २० मार्च २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या सोबत झालेल्या बैठकीतील ठरावानुसार नियमित आर्थिक लाभाची व सामाजिक सुरक्षेची पेन्शन लागु करावी यासाठी सरकारने समिती गठीत करून तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले व आता पुन्हा मुदतवाढ दिली, तसेच केंद्राने एनपीएसचा कायदा करुन हक्काची पेन्शन हिरावून घेतली. यासाठी राज्य सरकारी, जिल्हा परिषद, निमसरकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर, चतुर्थ श्रेणी कर्मचारी, नगर पालिका, ग्राम पंचायत, कंत्राटी कर्मचारी यांचा देश पातळीवर नेतृत्व करणारा अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्या वतीने फक्त एनपीएस रद्द करून जुनी पेन्शन ओपीएस योजना लागू करण्यासाठीच्या एकमेव मागणी करीता आता आरपारची लढाई करण्याचा कठोर निर्णय संबंधित सर्व संघटनांनी घेतला आहे.या अनुषंगाने उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांना विविध मागण्या बाबतचे निवेदन देण्यात आले.

यावेळी शासकीय निमशासकीय कर्मचारी संघटना रायगड जिल्हा समन्वय समितीचे सरचिटणीस संतोष पवार,शिवाजी सुर्यवाड , संदिप भंडारे , नितीन घरत , सुनील सुरवाडे, रूशाली पाटील, प्रियांका देवरे,बालाजी देशमुख आदी शासकीय अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



# कन्नड तालुका पत्रकार संघाचे नायब तहसीलदार यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्ह्यातील पाचोरा येथील पत्रकाराला सत्ताधारी आमदारांच्या गुंडाकडून मारहाणी बाबत आरोपी वर पत्रकार संरक्षक कायदया अंतर्गत कारवाही करावी, असे निवेदन देण्यात आले. जळगाव जिल्ह्यात एका आठ वर्षाच्या अल्पवयीन मुलीची अत्याचारानंतर हत्या करण्यात आली होती.

या घटनेचे वार्तांकन पाचोरा येथील पत्रकार संदीप महाजन यांनी केले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी वार्तांकनात टिका करण्यात आली होती. त्यामुळे शिंदे गटाचे पाचोरा विधानसभा मतदारसंघाचे आ. किशोर पाटील यांनी त्यांना फोन करून थेट शिवीगाळ करीत जिवे मारण्याची धमकीही दिली. या संभाषणाचा ऑडिओ सोशल मिडियात व्हायरल झाला आहे. या धमकीनंतर पत्रकार संदीप महाजन यांनी जळगाव पोलिसांकडे स्वतःसह कुटुंबाच्या जिवाला धोका असल्यामुळे पोलिस संरक्षण देण्याची मागणी केली होती. मात्र, त्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यानंतर पाचव्या दिवशीच रिपोर्टिंग करून दुचाकीवर घर जात असताना पत्रकार संदीप महाजन यांना गुंड प्रवृत्तीच्या चार जणांनी रस्त्यात आडवून जिवघेणा हल्ला केला.

या गुंडागर्दीच्या प्रकारानंतर पोलिसांनी केवळ अदखलपात्र गुन्हा नोंदविला आहे. पत्रकार महाजन यांना शिविगाळ करीत धमकी देणारे आ. किशोर पाटील यांच्यासह मारहाण करणाऱ्या गुंडाच्या विरोधात जिवे मारण्याचा प्रयत्न ( आयपीसी कलम ३०७ ) व पत्रकार संरक्षण क़ायदयानुसार गुन्हा नोंदवून संबंधितांना तात्काळ अटक करावी. पत्रकार महाजन यांच्या कुटुंबास पोलिसांचे संरक्षण देण्यात यावे अशी मागणी छत्रपती संभाजीनगर मराठी पत्रकार संघ, श्रमीक पत्रकार संघातर्फे आपल्या माध्यमातुन राज्य शासनाकडे करण्यात येत आहे.

# बन्नाळीच्या पुनर्वसनासाठी आमदारांना यश का आले नाही ?

## साई पाटील चपळे यांचा आ. राजेश पवारांना सवाल

आधुनिक केसरी न्यूज

बाबूराव गोणारकर



**धर्माबाद :** बन्नाळी गावच्या पुनर्वसनाचा प्रश्न मागील १९९६ पासून सरकार व आमदार - खासदारांच्या निष्क्रियतेमुळे शासन दरबारी रेंगाळत पडला आहे.अजूनही प्रश्न निकाली निघाला नाही तरी आमदार राजेश पवारांच्या प्रयत्नाला यश येऊन हा प्रश्न सुटणार याचा गवगवा करून त्याचे श्रेय घेण्याची घाई का ? असा सवाल ग्रामस्थ करीत आहेत. बन्नाळी ह्या गावाला दोन्ही बाजूनी नदी व नाल्यानी वेढलेले आहे. पावसाच्या पाण्याचे प्रमाण वाढले की,गाव पाण्याखाली जाण्याचा धोका असतो.त्यामुळे अतिवृष्टी झालेल्या वर्षी लोकांना धर्माबादच्या शासकीय इमारतीच्या आश्रयाखाली यावे लागते. याला वैतागून गावकऱ्यांनी शासनाकडे गावच्या पुनर्वसनाची मागणी लावून धरली. त्यामुळे जून १९९६ ला तत्कालीन जिल्हाधिका-यांनी मंजुरी दिली होती.२००८ साली भूसंपादन कायदा १८९४ च्या कलम ५२ अन्वये बन्नाळी ( गुरुजवळा ) येथील गट क्रमांक १२,१३,१४,१५,१७,१८,व नागोराव चपळे, माधव चपळे, उमाकांत चपळे, सुरेश चपळे, खाकी साब तुकडेकर, हेमंत बाबा कुलकर्णी,शिवकांत चपळे, मधील चौदा हेक्टर जमिनीच्या अधिग्रहणाची अधिसूचना निघाली. मात्र शासनाकडून योग्य मोबदला मिळत नसल्याच्या कारणावरून हे प्रकरण २००९ ला औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठात पोहचले.८ ऑक्टोबर २००९ ला हायकोर्टाने भूसंपादन प्रक्रिया जैसे थे ठेवण्याचे निर्देश दिल्यामुळे हे प्रकरण ९०० दिवस थंड बस्त्यात पडले होते. २०१२ ला हायकोर्टाने ह्या प्रकरणावरील स्थगती उठविली. मात्र हे प्रकरण पुन्हा २०१४ ला कोर्टाच्या दालनात पोहचले होते. काही काळ पुन्हा त्याला स्टे मिळाला. २०१५ ला तत्कालीन उपविभागीय अधिकारी प्रवीण धरमकर यांनी हे प्रकरण निकाली काढत संबंधित शेतकऱ्यांना ८६ लाख ६८ हजार १८० रुपये त्यांना अदा करून हे १४ हेक्टर भूसंपादन करण्याचे निर्देश दिले होते. मात्र खरी गंमत तर येथेच आहे.१९९६ ते २०२३ पर्यतच्या या सत्तावीस वर्षात दोन वेळेस भाजप - शिवसेना युतीचे तर दोन वेळेस काँग्रेस - राष्ट्रवादी आघाडीचे सरकार सत्तेत येऊन गेले.२०१५ ला हे प्रकरण निकाली निघाल्या पासून विचार केल्यास सहा वर्ष भाजपचे तर दोन वर्ष महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आहे. तरीही आज पर्यंत या ८६ लक्षपैकी ८६ दमडीही सरकारकडून भूसंपादनासाठी मिळालेले नाहीत.

जुलै २०२३ ला बन्नाळी गावात पाणी शिरल्यामुळे तेथील लोकांचे धर्माबादमध्ये स्थलांतर करावे लागले होते. यावेळेस काँगेसचे युवा नेते प्रा. रवींद्र पाटील चव्हाण यांनी ग्रामस्थांना भेट देतमाजी सरपंच साई पाटील,सरपंच प्रतिनिधी लक्ष्मण निदानकर,साईनाथ देविदास चपळे,नवीन पाटील, श्रीधर( राजू )करे,यांच्यासह शिष्टमंडळ घेऊन हे प्रकरण माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्याकडे घेऊन गेले होते. त्यामुळे सत्ताधारी खासदार आणि आमदार राजेश पवार यांनी ही भेट घेऊन हा विषय सोडविण्यासाठी आपणच कसे सक्षम आहोत.हा प्रश्न लवकरच निकाली काढू याचे श्रेय घेण्यासाठी धडपड सुरु झाली. यामुळे चांगलेच त्रस्त झाले असून आमदार राजेश पवार यांची २०१७ मधील सोशल मीडियातील एक पोस्ट व्हायरल होत आहे. यामध्ये तत्कालीन सरपंच साई पाटील यांनी राजेश पवार यांची भेट घेतली असता हे प्रकरण लवकरात लवकर निकाली काढण्याचे आश्वासन राजेश पवार यांनी शिष्टमंडळाला दिले होते.मात्र २०१७ बन्नाळीच्या पुनर्वसनासाठी पासून प्रयत्न करणाऱ्या विद्यमान आमदारांना आता पर्यंत यश का आले नाही ? तरीही आपण जणू निकालात काढल्याचे समजून ही श्रेयवादाची घाई कशासाठी ? हा प्रश्न गावकरी साई माली पाटील यांनी उपस्थित केला आहे.

**घटनाक्रम**

- १९९६ ला शंकर वाघमारे यांनी मोठे आंदोलन केल्यामुळे पुनर्वसनाला मंजूरी
- तत्कालीन सरपंच रुपाली रामचंद्रराव पाटील यांच्या काळात ग्रामपंचायतीत ठराव मंजूर
- २००८ ला भूसंपादनासाठी अधिसूचना जारी
- २००९ ला नागोराव भोजराम चपळे यांची कोर्टात रिट पिटीशनमुळे स्थगिती
- २012 ला स्थगती उठविली .
- २015 ला ८६ लक्ष ६८ हजार १८० रुपये मोबदला देऊन भूसंपादन करण्याचा निवडा
- आजपर्यंत एकही रुपया शासनाकडून मिळाला नाही .मंग आमदार राजेश पवार यांनी शेतकरांचं मावेज मिळण्यासाठी काय पाठ पुरावा केले .? हे एक कोडंच आहे .

# पिंपळगाव (हरेश्वर) व चिपळूणच्या घटनेचा निषेध; तहसीलदारांना दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** पिंपळगाव ( हरेश्वर ) व ओंबळी ता. चिपळूणच्या घटनेचा नाभिक महामंडळातर्फे तीव्र निषेध करण्यात आला. तहसीलदारांना नाभिक महामंडळाच्या वतीने निवेदन देऊन तात्काळ कसून चौकशी व न्यायायची मागणी करण्यात आली. न्याय न मिळाल्यास १५ ऑगस्ट पासून राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. यावेळी तालुका उपाध्यक्ष बापू राव पंडित, शहर अध्यक्ष नितीन सोनवणे, सचिव महेश एलिस,योगेश निकम, रामा एलिस, रघुनाथ एलिस, अतुल एलिस, बळीराम सोनवणे, दत्तात्रय एलिस, सागर पंडित, गणेश नेरपगार, राजेश एलिस, अजय नेरपगार, देवेंद्र पंडित व शंकर वाघ यांची उपस्थिती होती.






# मनपात धडकला सफाई कामगारांचा मोर्चा

## आयुक्तांसह महापौरांशी केली मागण्यांविषयी चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** हजेरीसाठीचे थम्स व सातव्या वेतन आयोगाविषयीच्या मागण्यांसाठी सफाई कामगारांचा मोर्चा गुरुवारी सायंकाळी ५ वाजता धुळे महापालिकेत धडकला. मोर्चेकरी थेट आयुक्तांच्या दालनात शिरले. यावेळी महापौर व आयुक्तांनी निवेदन स्वीकारून मोर्चेकऱ्यांशी चर्चा करीत त्यांच्या मागण्यांबाबत दोन दिवसात निर्णय घेऊ असे आश्वासन दिले तसेच चर्चेसाठी शिष्टमंडळ घेऊन या असे सांगितल्यानंतर मोर्चेकरी परतले.

सफाई कामगारांचे दिवसातून हजेरीसाठी ४ वेळा थम्स घेतले जातात. शहरातील वेगवेगळ्या भागात सफाई कर्मचारी राहतात. काहींची घरे मनपापासून खूप लांब आहेत. काहींजवळ वाहने



नाहीत. अशा परिस्थितीत केवळ थम्स साठी मनपात दिवसातून ४ वेळा ये-जा करणे गैरसोयीचे ठरते. हे थम्स दिवसातून ४ ऐवजी २ वेळा घेण्यात यावेत. तसेच ७ व्या वेतन आयोगाचा फरक मिळालेला नाही. तो एका टप्प्यात देण्यात यावा हजेरी पत्रक २५ तारखेस जमा करण्याचे आदेश देऊन ५ तारखेच्या आत पगार करावेत या मागण्यांसाठी सफाई कामगारांनी गुरुवारी सायंकाळी ५ वाजता धुळे महापालिकेवर मोर्चा आणला. मोर्चेकऱ्यांनी आयुक्तांच्या दालनात जाऊन मागण्यांविषयी निवेदन दिले. यावेळी यावेळी महापौर प्रतिभा चौधरी व आयुक्त देविदास टेकाडे यांनी निवेदन स्वीकारून मोर्चेकऱ्यांशी चर्चा करीत त्यांच्या मागण्यांबाबत दोन दिवसात निर्णय घेऊ असे आश्वासन दिले. तसेच चर्चेसाठी शिष्टमंडळ घेऊन या असे सांगितल्यानंतर मोर्चेकरी परतले. मोर्चेकऱ्यांनी दिलेल्या निवेदनावर मुनाफ कादर शेख, राजू पगारे, सुनील चित्ते, दिलीप माळी, प्रकाश गवळी, राजू कांबळे, कुणाल बोरसे, गब्बर शेख, वसीम नूर शेख, बापू खरात, भानुदास भवरे, सलमान शब्बीर शेख, समशेर नादर बेग, अस्लम शिरान शेख, हसन अकबर शेख, सलमान शकील शेख, नवाब गुलाब बेग, कुतुबुद्दीन मुनीर शेख, हुसेन सलीम शेख, हुसेन मेहबूब शेख, अल्ताफ सलीम शेख, ओम बैसाणे यांच्या सह्या आहेत.



# पर्यावरण संवर्धन व विकास समितीकडून वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दि.10 ऑगस्ट रोजी पर्यावरण संवर्धन व विकास समितीच्या वतीने देवाडा येथिल जि. पं. शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर डेबू सावली वृद्धाश्रमात वृक्षारोपण व निसर्ग एकवणकर याचा वाढदिवस वृद्धाश्रमात साजरा करण्यात आला . श्री संत गाडगेबाबा, श्री डेबुजी सावली वृद्धाश्रमात देवळा येथे निसर्ग दिनेश एकवणकर यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संवर्धन व विकास समिती यांच्यावतीने वृक्षारोपणाचे कार्य आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वृद्धाश्रमात असलेल्या वृद्धांना फळ बिस्किटाचे वाटप करण्यात आले. गाडगेबाबा यांच्या चरणी विनम्र अभिवादन करून येथील आजी आजोबांनी निसर्गाच्या वाढदिवसानिमित्त भरभरून आशीर्वाद दिले. याच निमित्ताने डेबू सावली येथील वृद्धाश्रमात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी या वृद्धाश्रमात सदस्या निशा धोंगडे यांनी या वृद्धाश्रमाची हित भूत माहिती पर्यावरण समितीच्या सदस्यांना सांगितली.शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संवर्धन व विकास समितीकडून आंब्यांचे वृक्ष देवु शुभेच्छा दिल्या. तर आ. सुधाकर अडबाले यांनी निसर्ग याला वाढदिवसाच्या निमित्ताने पुष्पगुच्छ देऊन पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या वृद्धाश्रमात असलेल्या महिला शिक्षिका सुदा मुडे यांनी निसर्ग यांना वाढदिवसाच्या प्रित्यर्थ सुंदर अशी एक कविता सादर केली. शुभ आशीर्वादसह ,हार्दिक शुभेच्छा दिल्या . त्यावेळी डी. के. आरीकर, प्रा. रमेशचंद्र दहिवडे, जामदार साहेब, राजेश पिंजरकर, अमृतलाल राठी, निशा धोंगडे, स्वाती दुर्गमवार, वंदना कातकर, कविता तिजारे, दिनेश एकवणकर, भेलके आणि डेबू सावली वृद्धाश्रमातील वृद्ध नागरिक उपस्थित होते.

# भोकर तालुक्यात जागतिक आदिवासी दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात जागतिक आदिवासी दिनानिमित्त शहरात व तालुक्यात विविध ठिकाणी कार्यक्रम घेवून ऊत्साहात साजरा करण्यात आला.
महानायक, क्रांतिवीर बिरसा मुंडा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण, ध्वजवंदन, मणिपूर घटनेच्या निषेधार्थ रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन तालुक्यातील नवीन आमदरी, गारगोटवाडी, आमदरीवाडी, ताटकळवाडी, वाकद, बोरवाडी, पांडुरणा, समंदरवाडी, नारवट, डोरली, बाबनवाडी, झिंगरवाडी, आमदरी व भोकर शहरातील बिरसा मुंडा चौक येथे मणिपूर घटनेचा निषेध करीत जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंपत मेंडके, आनंद डोखळे, साहित्यिक तुकाराम भिसे, समन्वयक गंगाधर वानोळे यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी सभापती शिवाजी देवतळे यांच्या अध्यक्षतेखाली हरिदास मेंडके, सेवानिवृत्त तहसीलदार डी. के.डुकरे, सरपंच जयवंत खुपसे, माजी सरपंच माधव माजाळकर, धोंडिबा भिसे, मारोती खुपसे, माजी सरपंच काशिनाथ मेंडके, बापूराव वागतकर, संदीप बोथिंगे, माधव शिंदे, गिरमाजी वागतकर, सरपंच ज्ञानेश्वर गव्हांडे, उपसरपंच सुदाम टारपे, तंटामुक्ती अध्यक्ष दिगंबर डोखळे, माजी सरपंच गणपती वागतकर, हरिदास टारपे, सुभाष खुपसे, पंडित वागतकर, दासराव खुपसे, उपसरपंच नागोराव झाडे, सरपंच दिगंबर वाकेकर, अविनाश वागतकर, संदीप वागतकर, कृष्णा देवतळे, कृष्णा वागतकर यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती. यावेळी भोसी मुख्याध्यापक संजय देशमुख, पुंडलिक लांडगे, सिताखांडी येथे मुख्याध्यापक श्री. वानखेडे , साळावाडी आश्रम शाळेत सुदाम देशमुखे यांच्या अध्यक्षतेखाली बिरसा मुंडा यांना अभिवादन करून जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.

**प्रलंबित कामाला मुहूर्त लागेना :** तत्कालीन पालकमंत्री तथा भोकरचे आमदार, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी भोकर शहरात आदिवासी मुला–मुलींसाठी शासनाच्या जागेत वस्तीगृह इमारतीचे बांधकाम, शहरात बिरसा मुंडा यांचा भव्य पुतळा व बोरवाडी गावात सांस्कृतिक सभागृह आणि डोरली येथे तलाव कामाचे आदेश दिले असतानाही आजपर्यंत ही कामे झाली नाहीत . याची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करावी व प्रस्तावित कामास गतीन देऊन येत्या बिरसा मुंडा जयंतीदिनी भूमिपूजन व्हावे अशी आग्रही मागणी भोकर तालुका आदिवासी सामाजिक कार्यकर्ते, राजकीय कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांनी केली .

# आदिवासी बांधवांना अन्न धान्य वाटप करून आदिवासी दिन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** संयुक्त राष्ट्र संघाने 9 ऑगस्ट 1994 रोजी 9 ऑगस्ट हा दिवस जागतीक आदिवासी दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. आणि याच आदिवासी दिनाचे औचित्य साधून जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टचे प्रीतम म्हात्रे व आदिवासी बांधवासाठी रात्रंदिवस झटणारे सामाजिक कार्यकर्ते,आदिवासी मित्र, केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक रायगड भूषण राजू मुंबईकर यांच्या माध्यमातून अर्थातच केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून उरण तालुक्यातील चिरनेर येथील अक्कादेवी आदिवासी वाडी, माकडडोरा आदिवासी वाडी येथील बांधवाना तांदूळ, डाळ , गव्हाचे पीठ,साखर, चहा पावडर, मीठ बिस्कीट या प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्थेचे तालुका सचिव अनिल घरत यांच्यासह केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

आदिवासी बांधवांच्या सुख - दुःखात त्यांच्या मदतीला धाऊन जाणारे आदिवासी मित्र - सखा म्हणून परिचित असलेले प्रितम म्हात्रे,राजू मुंबईकर हे नेहमीच या आदिवासीं समाजाच्या प्रगती करिता करत असलेले प्रामाणिक कार्य सर्वांना प्रेरणादायी ठरणारं असचं आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना मात्र आदिवासीं बांधव आज ही उपेक्षितांचे जीवन जगत आहेत.गरिबी,अज्ञान,निरक्षरता,बालमजुरी,बेरोजगारी अश्या अनेक समस्यांना आजही आदिवासीं बांधवांना तोंड द्यावं लागतं आहे त्यातच समाजात, प्रीतम म्हात्रे,राजू मुंबईकर आणि इतर काही यांसारखी हाताच्या बोटावर मोजण्या इतकीच काही व्यक्तिमत्त्व आहेत की ती या विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असणाऱ्या आदिवासीं बांधवांना समाजाच्या आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र झटतं आहेत, त्यांच्या करिता आशेचा किरण बनून उभे आहेत.आणि म्हणूनच आज हा समाज कुठेतरी स्वतःच्या हिंमतीवर,मेहनतीवर आपल्या पायावर खंबीरपणे उभा राहताना दिसत आहे.

# समतोल प्रकल्पातर्फे आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** ९ ऑगस्ट २०२३ बुधवार रोजी केशवस्मूर्ती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्पाच्या माध्यमातून जागतिक आदिवासी दिना निमित्त जोगलखेडे व वराडसिम ता. भुसावळ जि. जळगाव येथील मुला-मुलींच्या जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत आर. एल. हॉस्पिटल जळगाव यांच्या माध्यमातून आरोग्य तपासणी करण्यात आली.

समतोल प्रकल्पाचे व्यवस्थापक श्री प्रदीप पाटील व सहकारी श्री महेंद्र चौधरी यांनी सर्वप्रथम गावाचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात जोगलखेडे वा शेजारी असलेले वराडसीम या गावांची आरोग्य शिबिरासाठी निवड करण्यात आली. सर्वेक्षणात आढळून आले की जोगलखेडे गावात जवळपास संपूर्ण लोकसंख्या आदिवासी भिल्ल समाजाची आहे आणि तेथील आदिवासी मुलांना आरोग्य सुविधांची गावात पुरेशी व्यवस्था नाही तसेच काही



विद्यार्थ्यांना आरोग्याच्या समस्या आहेत. म्हणून गावात आरोग्य विषयक जागृती व विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी या उपक्रमाचे आज जागतिक अदिवासी दिना निमित्त आयोजन करण्यात आले. या शिबिरस्थानी सर्वप्रथम जागतिक अदिवासी दिनावर आधारित माहितीपर कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात सर्वप्रथम मान्यवरांनी भारतमाता आणि इंग्रजांविरोधात आदिवासी समाजाचे नेतृत्व करणारे बलिदानी वीर भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. आर एल हॉस्पिटलच्या जनसंपर्क प्रतिनिधी असलेले श्री स्वप्नील पालवे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम व शिबिरस्थानी आर एल हॉस्पिटलचे डॉ. श्री. अविनाश शिरुडे, सिस्टर मधु कोलकर , सिस्टर गीता मॅडम व वराडसीम ता. भुसावळ येथील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नीलिमा जोशी मॅडम, मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पौर्णिमा फेगडे मॅडम, जोगलखेडे ता.भुसावळ येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक दिपक पाटील सर व राहुल पवार सर यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन व प्रदीप पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रतिभा महाजन यांनी केले. समतोल प्रकल्पाचे महेंद्र चौधरी, विश्वजित सपकाळे, दीपक पाचपांडे, प्रशांत चौधरी, सौ.प्रतिभा महाजन, रविना भगत तसेच लखन सजोले यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



# प्रा. नरके फुलेंच्या विचारांचे खरे वारसदार : विचारवंत बेडकिहाळ

आधुनिक केसरी न्यूज

**फलटण :** महाराष्ट्रातील जेष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांचे ९ ऑगस्ट ला दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने मोठी हानी झाली असून प्रा.हरी नरके यांनी समाजाला दिलेले विचार,फुले शाहू आंबेडकर यांचा जन माणसात पेरलेला विचार सामाजिक चळवळ गतिमान करणारा आहे.आज प्रा.हरी नरके आपल्या तून गेले असले तरी त्यांनी मांडलेले विचार कायम स्मरणात राहणार आहेत. त्यांच्या आठवणींना व कार्याला उजाळा देण्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागातून श्रद्धांजली पर शोकसभेचे आयोजन करून त्यांना अभिवादन केले जात आहे.फलटण येथील महात्मा फुले चौकात महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने प्रा. हरी नरके यांना अभिवादन करण्यात आले.महात्मा फुले यांच्या विचारांचे खरे वारसदार प्रा.हरी नरके होते.असे मत फलटण साहित्य परिषदेचे अध्यक्ष व जेष्ठ विचारवंत रविंद्र बेडकिहाळ यांनी व्यक्त केले. त्यांनी आपल्या साहित्यातून आणि आपल्या जगभर दिलेल्या भाषणातून महात्मा फुले यांचे सत्यशोधक विचार रुजवले आणि मांडले.महात्मा फुलें यांचे समग्र वाड्मय महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रकाशित करण्यात प्रा.नरके यांचा मोलाचा वाटा आहे.



# धर्माबाद तालुक्याच्या विकासासाठी लढण्याचा निर्धार

## तेलंगणाप्रमाणे धर्माबादसाठी विकासाचे पॅकेज राज्य सरकारने घोषित करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** येथे मराठवाडा जनता विकास परिषद व सर्व पक्षीय बाभळी बंधारा कृती समितीची संयुक्त बैठक दि. 7 आगस्ट रोजी येथील कै. बाबा पाटील बन्नाळीकर प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात घेण्यात आली. ही बैठक बाभळी बंधारा दशक पूर्ती व 17 सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवानिमित्त आयोजित केली होती. अध्यक्षस्थानी मजवीप चे तालुका अध्यक्ष तथा माजी सभापती गणेशराव पाटील करखेलीकर हे होते. मार्गदर्शक म्हणून बाभळी बंधारा कृती समितीचे सचिव तथा भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यासाचे राज्य उपाध्यक्ष डॉ. बालाजी कोमपलवार व मजविपचे तालुका उपाध्यक्ष उत्तम राव पाटील शिंदे बाचेगावकर यांनी मार्गदर्शन केलेआहे.

बैठकीतील ठराव पुढील प्रमाणे घेण्यात आले.

1 ) बाभळी बंधारा होऊन दहा वर्षे झाली त्यातील त्रुटी शासनाने पूर्ण कराव्यात यासाठी बाभळी बंधारा दशकपूर्ती विशेषांक काढणे या विशेषांकात मागण्या शासनास करणे

2 ) महाराष्ट्र राज्याचे व तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री यांची भेट घेऊन बाबळी बंधाऱ्या संदर्भात समन्वय घडवून आणणे.

3 ) धर्माबाद तालुका विकास 2050 चा आराखडा विशेष अंक काढणे.

4 ) धर्माबाद तालुका सर्वांगीण विकासासाठी तेलंगाना प्रमाणे विकासाचे पॅकेज महाराष्ट्र राज्य सरकारने द्यावे. असे ठराव घेण्यात आले.

मार्गदर्शक डॉ. बालाजी कॉम्पलवार यांनी वरील सर्व ठरावावर सविस्तर मार्गदर्शन केले. वरील ठराव्या व्यतिरिक्त चर्चा करण्यात आली. या चर्चेत शेडमुख महाराज रोशनगावकर, शिवसेना जि. संघटक गणेश गिरी, काँग्रेस जि. सरचिटणीस नागभूषण वर्णी, भाजप जि. प्रवक्ता तथा संपादक शिवराज पाटील गाडीवान, छावा जि. उपाध्यक्ष सतीश पाटील शिंदे हारेगावकर, छावा ता. अध्यक्ष शिवराज पाटील चोळाखेकर, माजी उपप्राचार्य गोविंद पाटील मिरकुटे,बी आरएस पक्षाचे नवीन पाटील बन्नाळीकर, डॉ. प्रभाकरराव जाधव, डॉ. बालाजी श्रीगिरे, प्रा. उत्तमराव टाकळे, काँग्रेस शहर अध्यक्ष ताहेर पठाण,राजू सुरकुटवर,संपादक डॉ. सुधीर येलमे, पत्रकार कृष्णा तिममापुरे, माळगे नागनाथ, चंद्रभीम हाऊजेकर, लक्ष्मण तुरेराव, पांडुरंग पांचाळ, त्यांनी आपले विचार व्यक्त केले. सर्वपक्षीय प्रतिनिधी व पत्रकार उपस्थित होते.



अध्यक्षीय समारोप करताना गणेशराव पाटील म्हणाले वरील सर्व प्रश्न अनेक वर्षांपासून संघर्ष करूनही मिळत नसल्याने आपण आपसातील मतभेद विसरून धर्माबादकरांनी धर्माबाद च्या विकासासाठी एकत्र येऊन लढावे असे आव्हान केले आहे.

प्रारंभी छ. शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार टाकून बैठकीला सुरुवात करण्यात आली. बैठकीचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार मजविपचे जिल्हा सहसचिव जी.पी. मिसाळे यांनी केलेआहे.




# 'मेरी माटी, मेरा देश' अभियानाला प्रतिसाद

## भोकर पालिकेत पंचप्रण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील नगरपालिकेत गुरुवारी मेरी माटी मेरा देश कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यानिमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. मान्यवरांच्या उपस्थितीत पंचप्राण शपत घेण्यात आली आहे. नगर पालीकेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमास तहसीलदार तथा मुख्यअधिकारी राजेश लांडगे, नायब तहसीलदार सुनील पळसकर, नायब तहसीलदार रेखा चामणार, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बि. आर. पांचाळ, दिलीप पोतरे, सिद्धार्थ जाधव, उत्तम बाभळे , गंगाधर पडवळ, जयभीम पाटील , मनोज शिंदे , मधुकर गौवंदे यांची उपस्थिती होती. लांडगे म्हणाले कि, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ३० ऑगस्ट रोजी कर्तव्य पथावरील आझादी का अमृत महोत्सवाच्या समारोपाच्या निमित्ताने एका भव्य कार्यक्रमाला संबोधित करणार आहेत. या कार्यक्रमात ७ हजार ५०० गावातील माती खास कलशात आणली जाणार आहे सरकारने 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या भावनेने दिल्ली आणि ७ हजार ५०० गावांमध्ये देशी आणि स्थानिक वनस्पतींचे उद्यान उभारण्यासाठी 'अमृत वाटिका' योजना सुरू केली जाणार आहे 'मेरी माटी, मेरा देश' या अभियानांतर्गत देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूरवीर आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ भोकर येथील नुतन शाळेत 'शिलाफलक' स्मृती फलकही लावण्यात येणार आहे असे सांगतिले. लोकप्रतिनिधी, प्रशासन, लोकसहभाग अशा सर्वांचा सहभागाने.पंच प्राण प्रतिज्ञा, वसुधा वंदन, वीराना वंदन यांसारखे उपक्रम भोकर नगरपालिका क्षेत्रातील स्थानिक शूरवीरांच्या त्यागाला वंदन केले गावात युद्ध स्मारक शिलान्यास , वसुधा वंदन, स्वांतत्र्य सैनिक विराना वंदन व त्यांच्या पाल्याचा सत्कार, दिवे व माती गोळा करणे अदि उपक्रम घेण्यात आले. नगर परिषदेच्या प्रांगणात तहसीलदार तथा मुख्यअधिकारी लांडगे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी स्वांतत्र्य सैनिक गंगाधर कोलुरे, शहीदाचे पिता गणपत गौवंदे , शहीदाची माता आशाबाई गौवंदे , सखुबाई शिवाजी जिल्लेवाड, कमलबाई जाधव आदिचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुनिल कल्याणकर , सहायक प्रकल्पअधिकारी, कमलाकर भगत समुदायसंघटक,तमीजोद्दीन फसीयोदिन,रविकुमार महाबळे , संतोष सुंकरवार, माधव जमदाडे नगर अभियंता, दिलीप कल्याणकर, संभाजी वाघमारे, मरीबा शिंगणीकर, किशोर राठोड, साहेबराव मोरे, स.इमरान स.हिमायत अली, सुरेश मेहनतकर, संदेश दांडगे, सुरज अरपले, सुभाष माचनवार,मोहमद अखिब अभियंता, राजु चव्हाण, प्रकाश तोटालू, सचिन वैष्णव, आशोक डोंगरे, ज्ञानेश्वर श्रीरामवार, योगेश मुंडे संगणक अभियंता, बालाजी चवरे, वैजनाथ स्वामी, प्राजक्ता हापसकर , दत्ता अनंतवाड, धम्मपाल चंद्रे , शेख शब्बीर , संजय पवार, अदिनी परिश्रम घेतले.

# बातमी चित्रीकरण करणाऱ्या पत्रकाराला पोलिसांची अरेरावी; अधीक्षकांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** बुधवार दि.9 रोजी धुळे शहरातील कारागृहाजवळील एका अपघाताच्या बातमीसाठी चित्रीकरण करण्यासाठी गेलेले आधुनिक केसरीचे प्रतिनिधी आकाश सोनवणे यांना एका नवीन रुजू झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याने चित्रीकरण करण्यास मज्जाव केला व अश्लील हात वारे करून शिवीगाळ करण्यात आली त्या संदर्भात धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक यांना धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे निवेदन देण्यात आले व त्यांनी कारवाईचे आदेश देखील केले आहे.

धुळे शहरातील कारागृह समोरील जेलरोड येथे एका चहा विक्रेत्याच्या टपरीवर पोलीस कर्मचाऱ्यांनी पोलीस व्हॅन चढवली असता चहा विक्रेत्या व त्याचे वडील त्या गाडीखाली दाबले गेले होते तर त्या बातमीसाठी आकाश सोनवणे गेले असता एक नवीन रुजू झालेले पोलीस कर्मचारी त्या जखमींना गुंडगिरी सारखी भाषा वागणूक करत होते ते चित्रीकरण करत असताना पोलीस कर्मचाऱ्याने व्हिडिओ काढण्यास मज्जाव केला ते संतापात येऊन बोलले की तू माझा व्हिडिओ का काढत आहे तुझा काय संबंध असे सांगून ते निघून गेले व काही वेळात शहर पोलीस स्टेशन येथे पत्रकार त्याच बातमी संदर्भात गेले असता त्या पोलीस कर्मचाऱ्याने स्वतः पत्रकाराच्या जवळ येऊन धमकी दिली की तू कशी ही बातमी लाव माझं कोणीच वाकडे करू शकत नाही अश्लील हावभाव करून शिवीगाळ केली या घटने दरम्यान धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे धुळे पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांना निवेदन देण्यात आले व त्यांनी कारवाईचे आश्वासनही दिले आहे.परंतु या पोलीस कर्मचाऱ्यावर जर कारवाई नाही झाली तर लवकरच आयजी.बी जी शेखर यांना देखील निवेदन देण्यात येईल असे या ठिकाणी सांगण्यात आले आहे.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर